# संपादकीय

**ग्रंथपालांचे 'भिक्षा वाढा' आंदोलन कशासाठी?**

पुण्यात भरलेल्या अमृतमहोत्सवी साहित्य संमेलनाच्या वेळी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा ग्रंथपाल महासंघातर्फे 'भिक्षा वाढा' आंदोलन करण्यात आले. राज्यातील साठ टक्के शाळांमध्ये अजूनही ग्रंथालये नाहीत. ज्या २३५० शाळांमध्ये ग्रंथालये आहेत, त्यापैकी फक्त ७१० शाळांमध्ये पूर्णवेळ ग्रंथपाल आहेत; आणि १६४० अर्धवेळ आहेत. अर्धवेळ ग्रंथपालांपैकी ६७० खरे तर पूर्णवेळच्या निकषांनुसार पात्र आहेत, परंतु आर्थिक अडचणीचे कारण दाखवून १९९४ पासून त्यांना पूर्णवेळ करण्याची टाळाटाळ चालली आह. मुंबई उच्च न्यायालयाने पदवीधर ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपालाची श्रेणी द्यावी असा निवाडा दिला. तरीही त्याची अंमलबजावणी झालेली नाही. पाचव्या वेतन आयोगाने ग्रंथपालांचे सरासरी वेतन शाळेच्या शिपायाच्या बरोबरीला आणून ठेवले आहे आणि ग्रंथपालपदाची सगळी प्रतिष्ठाच हिरावून घेतली आहे. या शासकीय अनास्थेकडे लक्ष वेधावे म्हणून ग्रंथपाल महासंघाने साहित्य संमेलनात भिक्षा वाढा आंदोलन करण्याचा कटू निर्णय घेतला आणि तो अमलातही आणला. बहुतांशी ग्रंथालयांना स्वतंत्र व पुरेशी जागा नाही, वाचनालय नाही, फर्निचर नाही, ग्रंथवाचनासाठी वेळापत्रकात स्थान नाही, पुस्तक खरेदी व नियतकालिके खरेदी यात सातत्य नाही - याकडेही या महासंघाने लक्ष वेधले.

माध्यमिक शालेय ग्रंथालयांबाबतच अशी हेळसांड होत आहे असे नसून एकूणच महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालयांबाबत सरकारची डोळेझाक चालली आहे असे आढळून येते.

ग्रंथालयाच्या अनुदानाबाबत चालढकल चालते; ते अनेकदा नियमित मिळत नाही. त्यामुळे ग्रंथालयाची कुचंबणा होते. त्याबाबत वेळोवेळी ग्रंथालय-ग्रंथपालांच्या संघटनांनी आवाज उठवूनही सरकार त्याकडे लक्ष द्यायला तयार नाही. सार्वजनिक ग्रंथालये म्हणजे आधुनिक ज्ञानकेंद्रे आहेत. आणि मुद्रित ग्रंथ-नियतकालिकांबरोबर सीडी-रॉम, इंटरनेट, ई-बुक्स यांचाही त्यात आता समावेश होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने प्रशिक्षित ग्रंथपालांची गरज भासणार आहे. ग्रंथपालाच्या वेतनश्रेणी बुद्धिमान तरुणांना आकृष्ट करतील इतक्या आकर्षक असल्या तरच ग्रंथपालनाला आधुनिक काळाशी आपली गती सुसंवादी राखता येईल. नाहीतर नवे तंत्रज्ञान पुढे जात राहील आणि ही ग्रंथालये जुनी जीर्ण पुस्तके सांभाळण्याची गोडाऊन्स बनतील.

ग्रंथालयीन सेवकांच्या वेतनश्रेणी आणि सेवाशर्ती यांबद्दल सरकारकडे सतत धाव घेत राहून दोषारोप करीत राहणारी महाराष्ट्रातील ग्रंथालये स्वत:ची गुणवत्ता व उपयुक्तता वाढवण्यासाठी कितपत प्रयत्न करतात याचाही अंतर्मुख होऊन विचार करायला हवा. नव्या वाचकांना आकृष्ट करण्यासाठी ग्रंथपाल काय उपक्रम हाती घेतात? ग्रंथालयात रोज सर्व वयातील स्त्री-पुरुष वाचकांना यावेसे वाटावे असे वातावरण निर्माण करण्यासाठी किती ग्रंथपाल प्रयत्नशील



असतात? ग्रंथालयात नवीन पुस्तकांची खरेदी किती प्रमाणात व किती झटपट होते? वाचकांना नवी ताजी पुस्तके वाचण्याची उत्सुकता असते; वृत्तपत्रांतील जाहिराती व परीक्षणे वाचून पुस्तके मागायला गेले तर बहुतेक ग्रंथपाल 'ते पुस्तक अजून आलेले नाही'असेच उत्तर देतात. उत्सुक वाचकांचा अपेक्षाभंग करतात. साहजिकच नवीन वाचकाला त्या ग्रंथालयाकडे यावेसेही वाटत नाही.

ग्रंथालये आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण व्हावीत ही अपेक्षा कोणी बाळगत नाही; परंतु वाचकांना उपयुक्त अशा उपक्रमांद्वारे ग्रंथालयातील ग्रंथांची देवाणघेवाण वाढवून, आणि पूरक कार्यक्रम करून निधी संकलन करणे अवघड जाण्याचे कारण नाही. ग्रंथपालन वर्गात केवळ ग्रंथांची नोंद व जपणूक एवढ्यावरच मार्गदर्शन करून भागणार नाही. यापुढे जास्तीत जास्त वाचकांना आकृष्ट करून, ग्रंथालयांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होता यावे यासाठी काय करावे याबद्दलही प्रशिक्षण द्यावे लागेल.

नव्या पुस्तकांबद्दल वेगवेगळे कार्यक्रम करून, वाचकांमधले कुतूहल जागे करायला हवे. लोक-वाचक यांच्या भेटीचे योग आणायला हवेत. पुस्तकांवर चर्चा घडवून आणायला हव्या. त्या त्या गावातील व भागातील एक सांस्कृतिक केंद्र म्हणून ग्रंथालयाने आपले स्थान निर्माण केले पाहिजे. इंटरनेट, मल्टिमीडिया, सायबरकॅफे यांच्यासारख्या उपक्रमाची व्यवस्था करून त्यातूनही आर्थिक लाभ उठवला पाहिजे. केवळ सरकारी अनुदानावर ग्रंथालयाचा संपूर्ण गाडा चालावा अशी मानसिकता ठेवून यापुढे चालणार नाही.

शालेय ग्रंथालयांच्या ग्रंथपालांनी 'भिक्षा वाढा आंदोलन' करून आपल्या गाऱ्हाण्यांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे हे खरे असले, तरी बहुतेक माध्यमिक शाळांतील ग्रंथालयांचा वापर मुलांना फारसा करता येत नाही असेच प्रत्यक्षात दिसते.

बहुतेक ग्रंथपाल पुस्तकांच्या जपणुकीबद्दल इतके दक्ष असतात की मुलांना पुस्तके देण्याऐवजी कपाटे बंद ठेवण्यातच धन्यता मानतात. दर आठवड्याला मुलांना पुस्तके मिळायला हवी, अशी काही योजना कोणी आखून राबवते असे अपवादात्मकच दिसते. मुलांना शाळेच्या वयात पुस्तके हाताळायला मिळणे, वाचायला मिळणे आवश्यक आहे. त्यातून वाचन संस्कृती रुजते. नव्या ज्ञानाचा शोध स्वयंप्रेरणेने घेण्याची वृत्ती जोपासली जाते. पुस्तके म्हणजे ज्ञान, पुस्तके म्हणजे अज्ञात विश्वाचा शोध घेण्याचा दरवाजा हे विद्यार्थी वयात लक्षात आले की मुले पुस्तक वाचत नाहीत या तक्रारीला जागाच राहणार नाही. केवळ करमणूक म्हणून पुस्तके फार कमी प्रमाणात वाचली जातात. त्या करमणुकीबरोबर त्याद्वारे जे ज्ञान मिळते, जीवनाचे नवे दर्शन होते, आयुष्य सार्थकी लावण्यासाठी जे मंत्र मिळतात त्यामुळे पुस्तके वाचली जातात.

विद्यार्थ्यांना त्या ज्ञानाची चटक लागली की मग ती पुस्तके वाचतात की टी.व्ही. बघतात याची चिंता करण्याचे कारण नाही. ज्ञान मिळवण्याचा मार्ग म्हणून ते त्या त्या वयाला व वातावरणाला सोयीचे असेल ते माध्यम बरोबर हातळतात.

तेव्हा ग्रंथपालांनी केवळ नोकरी व उपजीविकेचे साधन म्हणून काम करण्याची वृत्ती सोडून मुलामुलींच्या ज्ञानविषयक गरजा पूर्ण करण्याचे केंद्र म्हणून ग्रंथालयांकडे बघायला हवे. मुलांची जिज्ञासूवृत्ती वाढवणे व त्या जिज्ञासूवृत्तीला सतत खाद्य पुरवत राहणे ही प्रक्रिया मग सतत चालू राहते. यापुढे शाळाकॉलेजातले अभ्यासक्रमही केवळ घोकंपट्टीवर आधारलेले

राहणार नाहीत, त्यात आपल्या बुद्धीचा व विविध ज्ञानशाखांतील ज्ञानाचा वापर करण्याच्या क्षमतेवर भर राहणार आहे, ज्ञानात नवी भर घालण्यावर त्या त्या मुलामुलींच्या शिक्षणाचे मोल ठरणार आहे. त्यादृष्टीने ग्रंथालयांचे स्वरूपही बदलणे क्रमप्राप्त ठरणार आहे. नव्या पुस्तकांची माहिती मिळवणे, नव्या ज्ञानक्षेत्रांबद्दल जागरुक असणे हेही ग्रंथपालाचे एक आवश्यक काम ठरणार आहे. केवळ जुनी पुस्तके सांभाळीत बसण्याची रखवालदाराची भूमिका यापुढे पुरेशी ठरणार नाही.

महाराष्ट्र सरकारच्या खजिन्यात सध्या खडखडाट आहे. शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनाव्यतिरिक्त कुठलाही खर्च करण्यासाठी सरकारजवळ पैसा नाही. त्यामुळे ग्रंथपालांच्याच काय, इतर लोकांच्या रास्त मागण्यांकडेही लक्ष देण्यासाठी उसंत सरकारला नाही.

सरकारी अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षम कार्यपद्धतीमुळे राजा राममोहन रॉय फाऊंडेशनची खरेदी, खडूफळा योजना वा विज्ञान साहित्य खरेदी योजना यांच्यात मोठाच कालापव्यय होतो. ताजी पुस्तके शाळा वा ग्रंथालये यांच्यापर्यंत पोचू शकत नाहीत. संगणकयुगात ही अकार्यक्षमता अशीच चालू देणे हा जनकल्याणकारी लोकशाहीचा उपमर्द आहे.

'भिक्षा वाढा' सारखे आंदोलन ग्रंथ संस्कृतीशी संबंधित अशा व्यक्तींवर करण्याची पाळी यावी ही संबंधित प्रशासकीययंत्रणांना लाजिरवाणी गोष्ट आहेच; पण ग्रंथपालांनीही सुजाण नागरिकांना अधिक चांगली सेवा देऊन, ग्रंथालय हे ज्ञानकेंद्र बनवून, स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनवण्याचा प्रयत्न करावा - हे काळाचे आव्हान आहे, असे समजून आपले ध्येयधोरण बदलायला हवे.

एकूणच समाजाच्या ज्ञानविषयक गरजा वाढत आहेत. पुस्तके व इलेक्ट्रॉनिक माध्यमे यांचा वापर त्यामुळे वाढणार आहे. या वाढत्या गरजांची पूर्तता करून आपण स्वत:च्या पायावर उभे राहण्याएवढे बळ मिळवू शकतो अशी खूणगाठ मनाशी बांधून ग्रंथव्यवहाराशी संबंधित सर्वच घटकांनी यापुढे पावले टाकायला हवीत. हा या काळाचाच हवाला आहे.

# लोकप्रिय ठरलेल्या पुस्तकांच्या नव्या आवृत्त्या

| | | |
|---|---|---|
| बाबुलमोरा | रणजित देसाई | १२५ रु. |
| धुमारे | माधवी देसाई | ७० रु. |
| प्रीतीचा शोध | वि. स. खांडेकर | १५० रु. |
| मृद्गंध | इंदिरा संत | १६० रु. |
| चाणक्य | भा. द. खेर | २५० रु. |
| पृथ्वीवर माणूस उपराच! | सुरेशचंद्र नाडकर्णी | ७० रु. |
| सेकंड लेडी(आयर्विंग वॅलेस) | अनु. रवींद्र गुर्जर | १३० रु. |
| रंग सुखाचे | डॉ. रमा मराठे | ८० रु. |



## साहित्यवार्ता

### साहित्य जीवनाभिमुख होण्यासाठी त्यातील दांभिकतेवर हल्ले आवश्यक

कालपर्यंत साहित्यातील अपप्रवृत्तीवर हल्ले करणारेच आज त्या अपप्रवृत्ती जोपासत आहेत. साहित्य जीवनाभिमुख होण्यासाठी त्यातील अशा दांभिकतेवर हल्ले होणे अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक म. द. हातकणंगलेकर यांनी केले. सुहास जेवळीकर यांनी लिहिलेल्या ऐरणीच्या देवा या पुस्तकावरील चर्चेत डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर, विजय तापस, निखिल वागळे यांनी भाग घेतला.

मनाचा मोठेपणा, सर्व माणसांशी समानता साहित्य शिकविते. हे साहित्याचे मोठे योगदान आहे. पण प्रत्यक्ष साहित्य व्यवहारात जेव्हा टोळ्या किंवा डबकी निर्माण होतात तेव्हा त्यातील प्रदूषणावर कोणीतरी भेदक हल्ला चढविणे आवश्यक असते, असे हातकंणगलेकर म्हणाले. टोळ्या निर्माण होण्यासाठी रस्त्यावर येऊन संघर्ष करण्याची हिम्मत असावी लागते. ही हिम्मत मराठी साहित्यिकांत नसल्याने साहित्यसंस्कृतीत जात, धर्म, प्रांत व हितसंबंध यांची जोपासना करणारी डबकी निर्माण झाली आहेत, असा प्रहार करून निखिल वागळे म्हणाले की, अशा डबक्याच्या संस्कृतीवर कोणत्याही नावाचे दडपण न बाळगता निर्भीड हल्ला करण्याचे धैर्य हवे. आजचे प्रकाशक हे प्रकाशक राहिले नसून, धंदेवाईक पुस्तकविक्रेते बनले आहेत. मराठीतील विविध साहित्यसंस्था शासनाची लाखो रुपयांची अनुदाने घेऊन भाषा व साहित्याच्या विकासासाठी नेमके काय करतात याचा जाब सर्वसामान्य माणसांनी विचारला पाहिजे.

निरपेक्षपणे साहित्यावर प्रेम करणाऱ्या वाचकांच्या अपेक्षाभंगाची गाथा म्हणजे ऐरणीच्या देवा हे पुस्तक आहे, असे प्रा. विजय तापस म्हणाले. तुच्छतावादाने ग्रासलेल्या या संस्कृतीत प्रस्थापित होत जाणे याचा अर्थ बधीर व बथ्थड होत जाणे. साहित्य संस्कृतीत व्यक्तिनिष्ठ गोष्टींना अवास्तव महत्त्व प्राप्त झाले आहे. साहित्यिक मूल्यमापन आणि वैयक्तिक संबंध यातील गल्लतीमुळे एकंदर साहित्य व्यवहार प्रदूषित झाला आहे अशी भूमिका त्यांनी मांडली.

### अमेरिका व महाराष्ट्र यातील 'मराठी विद्यापीठाचा सेतू'

जागतिकीकरणाच्या झंझावाताने मुंबईसह उभ्या महाराष्ट्रातील मराठी मन मातृभाषेच्या भविष्यातील अस्तित्वाबद्दल शंकाकुल झालेले असतानाच सातासमुद्रापलीकडच्या अमेरिकेतही आपली मराठी पाळेमुळे टिकवून ठेवण्याची कोशिश सुरू झाली आहे. केवळ मराठी भाषाच नव्हे, तर त्यासह मराठी संस्कृती, परंपरा आणि इतिहास रक्षणाच्या जबाबदारीचा हा प्रश्न असल्याने अमेरिका आणि महाराष्ट्र यांत 'मराठी विद्यापीठ' या एका आगळ्या संकल्पनेचा सेतू इंटरनेटसारख्या प्रगत तंत्रज्ञानाने बांधला आणि सांधला जावा म्हणून प्रभाकर देवधर यांनी

(इलेक्ट्रॉनिक क्षेत्रातील तज्ज्ञ) पुढाकार घेतला आहे.

व्यावसायिक स्पर्धा आणि व्यवहारातील उपयुक्तता या आघाडीवर मराठी भाषेचा आम्हाला उपयोग काय, असा सवाल महाराष्ट्रातील तरुण पिढीच्या ओठांवर आहे. अमेरिकेतील या मराठी कुटुंबांची मुले पहिली आठ ते नऊ वर्षे घरात मराठमोळ्या वातावरणात वाढतात, मग मात्र त्यांच्यावरील मराठी संस्कारांचा पगडा शालेय आणि महाविद्यालयीन वातावरणात विरळ होत जातो. अमेरिकन सुबत्तेबरोबरच खोलवर कुठेतरी या अस्वस्थतेचा डंख दूरदेशीच्या मराठी मनाला टोचत राहतो. 'मराठी' माझ्या पुढील पिढीतही संक्रमित व्हायला हवी असे मानणाऱ्या अमेरिकन मराठीजनांनी तेथील बृहन्महाराष्ट्र महामंडळाच्या माध्यमातून मराठी विद्यापीठाची संकल्पना पुढे आणण्यास देवधर तसेच अन्य मराठी समविचारी विचारवंतांना भाग पाडले आहे. अमेरिकेत विद्यार्थ्यांनी अन्य कुठल्या भाषांची वा तंत्रविषयाची पदवी व पदविका मिळवलेली असल्यास त्यांना विशेष प्राधान्य गुण (क्रेडिट पॉइंटस्) दिले जातात. त्यामुळे संकल्पित मराठी विद्यापीठाच्या माध्यमातून त्यांना मराठी भाषेची पदवी वा पदविका मिळाल्यास आणि या दूरशिक्षणाची सोय इंटरनेटच्या माध्यमातून झाल्यास व्यावहारिक गरजेच्या पूर्ततेसह त्यातील मराठीपणाचा ठसाही पक्का होईल, या शक्यतेवर आता विचारमंथन सुरू झाले आहे. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचे इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील सल्लागार आणि सुहद तसेच सध्या मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष असलेले प्रभाकर देवधर, ग्रंथाली'चे दिनकर गांगल, अनुभवी सनदी अधिकारी शरद काळे, मराठीचा वसा घेतलेले डॉ. सुरेश नाडकर्णी, ज्येष्ठ पत्रकार राधाकृष्ण नार्वेकर, ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक आदी प्रयत्नशील आहेत. मराठी विद्यापीठ या नावीन्यपूर्ण संकल्पनेच्या माध्यमातून अनेक उद्दिष्टे साध्य करता येतील. मराठीचे आंदोलन, शिक्षण आणि संस्कृती संवर्धन या त्रिवेणीचा योगही त्यामुळे जुळेल. मराठीच्या बेदखलीची उदाहरणे मराठी माणसाला चिंताग्रस्त करीत असतानाच मराठी विद्यापीठाची संकल्पना एका नव्या आशेचा किरण बनून पुढे आली आहे. त्यामुळे अमेरिका आणि महाराष्ट्रातील उद्याच्या तरुण पिढी सुसंवादही साधेल.

## सत्यजित राय माहितीकोश

भारतीय चित्रपटसृष्टीला आंतरराष्ट्रीय पातळीवर नेणारे दिग्गज दिग्दर्शक सत्यजित राय यांच्या कोलकाता येथील स्मारकसंस्थेने राय यांच्यावरील माहितीकोशाचा प्रकल्प हाती घेतला आहे.

अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाच्या सत्यजित राय यांना प्रामुख्याने ओळखले जाते ते चित्रपट दिग्दर्शक म्हणून. मात्र त्यांची ही एकच ओळख नाही. त्यांनी लघुकथा लिहिल्या. ते एक उत्तम रेखाचित्रकार होते, त्यांचे बालसाहित्यातील योगदानही मोठे आहे. राय यांची अशी अनेक अंगांनी ओळख करून देण्याचे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे, असे या कोशाचे संपादक प्रबोध मित्र यांनी सांगितले.

पश्चिम बंगाल सरकारच्या 'नंदन' चित्रपट संकुलातील सत्यजित राय यांच्या स्मारकाला जागतिक बँकेकडून १७ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

या माहितीकोशात सत्यजित राय यांच्या अनेक क्षेत्रातील मुलुखगिरीची माहिती तर असणारच आहे, शिवाय श्याम बेनेगल, गौतम घोष, पारितोष सेन अशा चित्रपट क्षेत्रातील



नामवंतांच्या लेखांचाही यात समावेश करण्यात येणार आहे.

सत्यजित राय यांनी संपादित केलेल्या लहान मुलांसाठीच्या 'संदेश' मासिकातील त्यांची चित्रे, साहित्य तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमाबद्दलची त्यांची व्याख्याने अशा दुर्मिळ गोष्टी यात बघायला मिळतील. चित्रपट, साहित्य, रेखांकन अशा विविध माध्यमांमधील मार्गदर्शक ग्रंथही ठरेल.

हा माहितीकोश जगातील अशा प्रकारचा दुसरा कोश ठरणार आहे. याआधी चार्ली चॅप्लिन याच्यावर असा माहितीकोश करण्यात आला आहे.

## 'टेडी बेअर'च्या शताब्दीनिमित्त ऐतिहासिक पुस्तक

'टेडी बेअर' म्हटले की आपल्या डोळ्यांसमोर एक छान गुबगुबीत खेळणे येते. आता तर त्या खेळण्याची लोकप्रियता केवळ बालगोपालांपुरती मर्यादित राहिलेली नाही. पाश्चिमात्य जगात अलीकडे प्रौढ प्रियजनांसाठी देखील टेडी बेअरची खरेदी केली जाऊ लागली आहे. लोकांची वेगवेगळी आवड लक्षात घेऊन या खेळण्याच्या वेगवेगळ्या आवृत्त्या बाजारात असतात. २५ युरोपासून १५३० युरोपर्यंत निरनिराळ्या किंमतीची ही अस्वले उपलब्ध आहेत. तथापि, या लोकप्रिय खेळण्याची पार्श्वभूमी फारच थोड्यांना माहिती असते. हे वर्ष टेडी बेअर'च्या जन्मशताब्दीचे वर्ष आहे, हे निमित्त साधून गुंथर फायफर नावाच्या जर्मन लेखकाने 'स्टेफ- हण्ड्रेड इयर्स ऑफ द टेडी बेअर' या शीर्षकाचे एक पुस्तकच प्रसिद्ध केले आहे.

या पुस्तकामध्ये गुंथरने दिलेल्या तपशीलवार माहितीनुसार २५ वर्षांच्या रिचर्ड स्टेफने आपल्या अपोलिना मागरिट स्टेफ नावाच्या आत्याच्या खेळणीउत्पादक कंपनीसाठी एक चांगले खेळणे तयार करायचे ठरवले होते. स्टुटगार्ट शहरामधील निल्शेन प्राणिसंग्रहालयात जाऊन त्याने कित्येक दिवस निरनिराळ्या प्राण्यांची वेगवेगळ्या भावमुद्रांमधील रेखाचित्रे काढली. नंतर ती सारी रेखाचित्रे पहिल्यावर त्याने तांबूस रंगाच्या अस्वलाची निवड केली आणि अगदी साध्या लाकडी भुशापासून, लोकरीच्या तुकड्यांपासून एक खेळणे तयार केले, त्यात वेगवेगळे बदल केले. कंपनीच्या वर्कशॉपमध्ये हातपाय आणि डोळे हलवू शकणारे खेळणे बनवण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभारली आणि ५५ पीबी असे पहिल्या मॉडेलला नाव दिले. त्या खेळण्याचे स्टेफपुरते नाव होते- पेट्सी.

त्याच सुमारास १९०२ साली नोव्हेंबर महिन्यात मिसिसिपीच्या जंगलांमध्ये शिकार करण्यासाठी गेलेले थिओडोर रूझवेल्ट एकही शिकार साधू शकले नव्हते. त्यांची निराशा टाळण्यासाठी अखेर एक लहान अस्वल झाडाला बांधण्यात आले आणि त्याच्यावर नेम धरून गोळी मारायला त्यांना सुचवण्यात आले. पण अशी शिकार करण्यात आपल्याला मुळीच रस नाही, असे सांगून अमेरिकेचे ते तत्कालीन राष्ट्राध्यक्ष त्या जंगलातून निघून गेले. त्यांच्या या फसलेल्या शिकारदौऱ्यालासुद्धा खूप प्रसिद्धी मिळाली. त्यामुळेच बहुधा स्टेफने आपल्या खेळण्याचे नाव बदलले आणि रूझवेल्ट यांचे 'टेडी' हे टोपणनाव त्याला दिले. ते लोकांनाही आवडले. इतके आवडले की गेली शंभर वर्षे त्या नावाची खेळणी जगभर विकली जात आहेत आणि आता तर माणसाच्या उंचीचे टेडी बेअर ५,११३ युरोंना मिळते आहे. तेवढ्या रकमेत युरोपमध्ये एक छोटीशी मोटारसुद्धा खरेदी करता येते, हे लक्षात घेतले म्हणजे त्या 'टेडी'ची लोकप्रियता किती

आहे, ते जाणवते.

## राजकारण्यांनी 'तोडलेली' माणसे लेखकांनी 'जोडली' पाहिजेत !

'राजकारणाचा गलिच्छ खेळ खेळताना एकगठ्ठा मतांच्या आकड्यांच्या गणितासाठी राजकारण्यांनी माणसे एकमेकांपासून तोडली. एकमेकांपासून तुटलेली माणसे आणि दुरावलेली मने जोडण्याचे काम लेखकांनी केले तरच त्यांना 'बुद्धिवादी' म्हणवून घेण्याचा अधिकार आहे', असे विचार अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, सुप्रसिद्ध कवी खलील मोमीन यांनी व्यक्त केले.

एकीकडे माणसाच्या जीवनाला प्रचंड वेग प्राप्त झाला आहे. आपल्याबरोबरचा, शेजारचा माणूस कुठल्या जाती-धर्माचा आहे हे पाहाण्याचा किंवा त्याबाबत विचार करण्याचा वेळ आज कोणाला नाही. काळ मागे लागल्यासारखा माणूस धावत सुटला आहे. पण हे असे धावत असताना त्याला धाप लागते. विचार करायला वेळ नाही, त्याची गरजही वाटत नाही, अशा परिस्थितीत समाजकंटक सहज फायदा उठवतात आणि साधी, सरळ, मध्यमवर्गीय माणसे गुमराह होतात. माणसाचे पर्यायाने समाजाचे नैतिक उन्नयन करणे हेच कोणाही साहित्यकृतीचे जन्मकर्तव्य असते. समाजाचे नैतिक उन्नयन साधून माणूसपणाची उंची जे वाढवते तेच खरे साहित्य.

परिवर्तनासाठी चळवळ करताना त्या चळवळीत सातत्य आणि निकोपता असणे गरजेचे आहे. विचारातील एकांगीपणा कमी होऊन आपल्या विचार-प्रवाहात इतरांना सांभाळून घेण्याची वृत्ती वाढली पाहिजे. आजच्या घडीला साहित्याने आणि साहित्यिकांनी हेच काम करणे गरजेचे आहे. खोट्या आक्रस्ताळेपणातून चांगली साहित्यकृती कधीही निर्माण होत नाही. साहित्यिकांनी जातीधर्माच्या बंदिस्त विचारांच्या भिंती मानूच नयेत, कारण नैतिकतेला आवाहन करीत साहित्य संस्कृती घडवत असते. ज्या समाजात उच्च दर्जाची साहित्य निर्मिती होते त्या समाजाचा नैतिक दर्जा नक्कीच उंचावतो, हिंदू-मुस्लिम समाजातच नव्हे तर माणसामाणसांत आज तेढ निर्माण झाली आहे. स्वार्थासाठी माणूस काय वाटेल ते करायला तयार होतो. मुस्लिम आणि इस्लाम धर्म याबाबत आपल्या समाजात बरेच गैरसमज आहेत. माणुसकीची आणि सदाचाराची शिकवण तर सगळेच धर्म देतात. तरीही माणसाच्या राजकीय, सामाजिक स्वार्थापोटी उत्पन्न झालेली धर्मातील तेढ कमी व्हावी आणि मैत्रीपूर्व संबंध वाढीस लागावे म्हणून मुस्लिम मराठी साहित्य परिषद हे सुसंवादाचे आणि सद्भावनेचे व्यासपीठ ठरावे. याद्वारे मुस्लिम समाजाचे चित्र, मनातल्या वेदना, प्रक्षोभ बाहेर पडून परिवर्तनाचे चक्र सुरू होईल.

जगणे समजून घेण्याच्या प्रयत्नातून कलाकृती, साहित्यकृती जन्माला येते. निसर्गाच्या पोटी कुठे धोतरा जन्माला येतो तर कुठे गुलाब, पण दोघांचे सौंदर्य आणि दोघांचे अस्तित्व हे त्या त्या ठिकाणी गरजेचे असते. साहित्याची निर्मितीही अशीच हृदयाच्या आतून होते. पण ही निखळ साहित्य कृती माणसाच्या मनाला भिडली पाहिजे. माणसातील माणूसपण जागे करून त्याच्यातील समतोल दृष्टी आणि वैचारिक क्षमता निकोप झाली पाहिजे. साहित्याने हेच काम करावे. त्यातूनच माणूस घडेल आणि माणूसपण वाढेल.



## दिल्लीतील विश्वग्रंथजत्रा

लहान मुले व विद्यार्थ्यांसाठी आजही उत्तम पुस्तकांची मोठी कमतरता आहे. जगात आघाडीवर असलेल्या भारतीय प्रकाशन उद्योगाने यात विशेष लक्ष घातले पाहिजे. स्वस्त किंमतीतली दर्जेदार व सचित्र पुस्तके विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याची आपली जबाबदारी आहे. अशी पुस्तकेच, विद्यार्थ्यांचे भविष्य घडवू शकतील. असे प्रतिपादन उपराष्ट्रपती कृष्णकांत यानी केले. राजधानीच्या प्रगतीमैदानावर भरवण्यात आलेल्या १५ व्या विश्व पुस्तक यात्रा (वर्ल्ड बुक फेअर) चे शानदार उद्‌घाटन उपराष्ट्रपतींच्या शुभहस्ते झाले. ग्रंथयात्रा २८ जानेवारी ते ४ फेब्रुवारीपर्यंत भरली होती. दळणवळण मंत्रालयातर्फे पुस्तक वर्षानिमित्त काढलेल्या खास टपाल तिकीटाचे लोकार्पणही यावेळी उपराष्ट्रपतींच्या हस्ते करण्यात आले.

उपराष्ट्रपती म्हणाले, भारतात बावीस भाषांमध्ये पुस्तकांचे प्रकाशन केले जाते. अमेरिका आणि ब्रिटननंतर इंग्रजी भाषेतील पुस्तक प्रकाशनातही, जगात भारताचा तिसरा क्रमांक लागतो. इतक्या मोठ्या प्रमाणावर पुस्तकांची निर्मिती करणारा भारतीय प्रकाशन उद्योग, जगातला अग्रेसर उद्योग आहे. गेल्या ५० वर्षात या उद्योगाने लक्षणीय प्रगती केली असून, सार्क देशांची तसेच आफ्रो- आशियाई देशांची गरज भागवण्याची क्षमता, एकट्या भारतीय प्रकाशन उद्योगात सध्या आहे, ही प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटावा अशी बाब आहे.

प्रमोद महाजन याप्रसंगी म्हणाले, माहिती तंत्रज्ञान व इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा ग्रंथवाचन व निर्मितीला धोका असल्याचे बोलले जाते, परंतु ही माध्यमे पुस्तकांचे स्थान कधीही ग्रहण करू शकणार नाहीत, कारण त्यात वेग असला तरी सखोलता नाही. इंटरनेट क्रांतीनंतर पुस्तकांचे स्वरूप व आकार कदाचित बदलेल, मात्र त्यांचे अस्तित्व कधीही नष्ट होणार नाही. अनादीकाळात जेव्हा छपाईदेखील अस्तित्वात नव्हती, तेव्हा या देशात मौखिक परंपरेतून ग्रंथांचे जतन केले गेले. पुस्तकांची मागणी कोणत्याही काळात कमी झाली नाही, आणि यापुढेही होणार नाही, असे महाजन म्हणाले.

विश्व पुस्तक मेळ्याचे संयोजन नेहमीप्रमाणे नॅशनल बुक ट्रस्टने केले. यंदा शब्दांचे जागतिकीकरण असे शीर्षक या ग्रंथयात्रेला देण्यात आले होते. ट्रस्टचे अध्यक्ष सीताकांत महापात्र म्हणाले, सृजनात्मक विविधतेच्या अनुवादाला ट्रस्टने सर्वाधिक महत्त्व दिले आहे. जागतिकीकरणाचा अर्थ, केवळ व्यापार उद्योगातील वृद्धी किंवा दारिद्र्य आणि दहशतवादापुरता मर्यादित असू शकत नाही. शब्दांच्या जागतिकीकरणात तर साऱ्या जगातल्या संस्कृतींना जवळ आणण्याचे सामर्थ्य आहे. पुस्तकेच हे काम प्रभावीपणे करू शकतात, असे महापात्र म्हणाले.

ज्येष्ठ हिंदी लेखक निर्मल वर्मा म्हणाले, हा पुस्तकांचा महाकुंभमेळा आहे. कुंभमेळ्याहून परततांना जसे गंगाजल घरी नेण्याचा संस्कार या देशात आहे त्याचप्रमाणे विश्व पुस्तक मेळ्यातून लोकांनी ग्रंथ आपल्या घरी न्यावेत, अशी संयोजकांची अपेक्षा आहे.

प्रत्येक खासदाराने आपल्या खासदार निधीतली किमान पाच टक्के रक्कम, आपल्या मतदारसंघातील बौद्धिक विकासासाठी, ग्रंथ खरेदीवर खर्च केली पाहिजे, अशी मागणी राष्ट्रीय हिंदी प्रकाशक संघाने याप्रसंगी केली. या ग्रंथजत्रेत एकूण ८०कोटी रुपयांची ग्रंथविक्री झाली.

## येशू ख्रिस्ताच्या जीवनावरील कादंबरीचे प्रकाशन

येशू ख्रिस्ताच्या जीवनावरील 'सुताराचा पोर' ही कादंबरी सध्याच्या संघर्षाच्या, हिंसेच्या वातावरणात शांततेचा मार्ग दाखवेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक शिवाजी सावंत यांनी केले.

धार्मिक अवडंबर दूर सारून येशूच्या मूळ शिकवणीकडे लक्ष देणे आवश्यक आहे, या दृष्टिकोणातून ही कादंबरी लिहिली गेली असल्याने मराठी वाचकाला ती आवडेल. येशूप्रमाणेच महंमद पैगंबरावरही मराठीत कादंबरी लिहिली जाणे आवश्यक आहे.

पवित्र शास्त्र, ऐतिहासिकता, भौगोलिकता आणि मानसशास्त्र यांची गुंफण करण्यात ही कादंबरी यशस्वी झाली असल्याचे रेव्हरंड भागवत यांनी सांगितले. तर लेखक सनी पटेल यांनी म्हटले की ही कादंबरी आपण ख्रिस्तेतर मराठी वाचकांसाठी सिद्ध केली आहे. यासाठी प्रत्यक्ष मध्यपूर्वेतील प्रवास, नवीन संशोधनाचा आधार आणि प्रभूची कृपा यामुळे मला येशूच्या जवळ जाता आले असा अनुभव वाचकांनाही येईल.

कॉन्टिनेंटल प्रकाशनाचे अनिरुद्ध कुलकर्णी यांनी चरित्रात्मक ऐतिहासिक कांदबरी या साहित्यकृतीमुळे जास्त समृद्ध झाली आहे, असे म्हटले.

## संक्षिप्त मराठी संज्ञाकोश

साहित्यसिद्धांत आणि साहित्यसमीक्षा यांचा परिचय करून देणारा संक्षिप्त मराठी संज्ञा कोश येत्या २९ डिसेंबर रोजी पुण्यात प्रकाशित झाला.

भरतमुनी, वामन, आनंदवर्धन, कुंतक, दण्डी, मम्मट, भामह इ. संस्कृतसाहित्यमीमांसक, ॲरिस्टॉटल, कोलरिज, मार्क्स, सार्त्र, हायडेगर, एलियट, देरिदा असे पश्चिमी साहित्यविमर्शक आणि राजवाडे, न. चिं. केळकर, बा. सी. मर्ढेकर, ह. ना. आपटे, दि. के. बेडेकर, द.ग. गोडसे, शरच्चंद्र मुक्तिबोध, गंगाधर पाटील, रा. ग. जाधव इ. मराठी समीक्षकयांच्या सिद्धांतांचा व विचारांचा परामर्श या ग्रंथात घेण्यात आला आहे. याखेरीज सिद्धांत, सम्यक, सौंदर्यशास्त्र, देशीवाद, कविता, कांदबरी, नाटक अशा अनेक संकल्पनांचे व सिद्धांताचे मुद्देसूद विवेचन या कोशामध्ये केले आहे.

साहित्य, चित्र, नाट्य व शिल्प या कलांमधील उदाहरणे देऊन कठीण विषयांचे सुलभ स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न आहे. केवळ अध्यापक व समीक्षक यांनाच नव्हे तर साहित्यरसिकांनाही हा कोश उपयुक्त ठरेल.

संपादक मंडळाचे सदस्य वसंत आबाजी डहाके म्हणाले, की इंग्रजी माध्यमाच्या शाळा निघत असल्या तरी बराच मोठा समूह अद्यापही मराठीतूनच व्यवहार करतो, मराठी साहित्याचा तो वाचक आहे त्यामुळे मराठी भाषेबद्दल चिंता करण्यासारखे काही नाही.

भटकळ यांनी स्पष्ट केले की या उपक्रमामध्ये नफा काढणे हा उद्देश नाही. डहाके, आशा राजवाडे, प्रभा गणोरकर, रमेश वरखेडे, जया दडकर या संपादकांनी मानधन अपेक्षिलेले नाही व हौसेने हे तज्ज्ञ हे किचकट काम करत आहेत.

Oxford Companion to English Literature या ग्रंथावरून या खंडाची संकल्पना सुचली असे सदानंद भटकळ म्हणाले. संज्ञा सोप्या भाषेत लिहिणे कठीण काम असते असे डहाके म्हणाले.

हा तिसरा खंड असून तो आधी तयार झाला. दुसऱ्या खंडाचे काम सुरू असून त्यामध्ये इ. सन १९२० ते २००० या काळातील साहित्याचा कोश पुढल्या वर्षी तयार होईल असे ते म्हणाले. हा काळ छोटा असला तरी यात घडले भरपूर; त्यामुळे काम बरेच आहे.

## प्रसारमाध्यमांनी जबाबदारी ओळखून वागणे आवश्यक : शर्मा

''कोणत्याही प्रसंगाच्या किंवा घटनेच्या वेळेस पुरेशी माहिती उपलब्ध झाली नाही, की प्रत्येक जण स्वत:चे अंदाज बांधतो. त्यातूनच अफवांचे पेव फुटते. अशा वेळी प्रसारमाध्यमांनी त्यांची जबाबदारी ओळखून वागणे आवश्यक ठरते,'' असे प्रतिपादन प्रसिद्ध पत्रकार रजत शर्मा यांनी पुणे येथे केले.

'सिम्बायोसिस इस्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन'च्या वतीने आयोजित केलेल्या 'फेस्ट ओ कॉम' या कार्यक्रमात ते बोलत होते.

''अमेरिकेत वर्ल्ड ट्रेड सेंटरवर झालेल्या हल्ल्यानंतर तेथील प्रसिद्धीमाध्यमांनी अतिशय जबाबदारीने वागून वार्तांकन केले. कोणीही सुरक्षा व्यवस्थेतील कमतरता, गुप्तहेरांचे अपयश याची चर्चा केली नाही. चौकशी समिती कधी नेमणार, अध्यक्ष राजीनामा कधी देणार, असेही विचारले नाही. त्या उलट सर्व जण एक होऊन दहशतवादाविरुद्ध उभे राहिले. आपल्या संसदेवर झालेल्या हल्ल्यानंतर मात्र असे चित्र दिसले नाही.''

''अमेरिकेतील प्रसारमाध्यमे जबाबदारीने वागली याचे एक प्रमुख कारण म्हणजे या घटनेविषयी त्यांना सर्व माहिती पुरवली जात होती. अध्यक्षांपासून अग्निशामक दलाच्या प्रमुखांपर्यंत सर्व जण पत्रकारांचे प्रश्न संपेपर्यंत माहिती देण्यासाठी उपलब्ध होते, आपल्या देशात हे होत नाही. घटना घडल्यानंतर संबंधित व्यक्ती प्रसिद्धिमाध्यमांपासून दूर जाण्याचा प्रयत्न करते, त्यामुळे अफवांचे पीक सुरू होते. इतर कोणत्याही माध्यमांतून पसरणाऱ्या माहितीपेक्षा अफवा फार वेगाने पसरतात. इथेच पत्रकारांनी जबाबदारीने वागणे अपेक्षित आहे.''

पत्रकारितेतील नीतिमूल्ये ठरविणे ही अवघड बाब आहे, असे सांगून ते म्हणाले, ''चांगले आणि वाईट यातील सीमारेषा खूपच सूक्ष्म आहे. त्याची व्याख्या करणे अवघड असले, तरीही ती समजणे फारसे अवघड नाही.''

पत्रकारितेतील नवे प्रवाह स्पष्ट करताना प्रतापराव पवार म्हणाले, ''वृत्तपत्रसृष्टी येत्या काही वर्षात तंत्रज्ञानातील बदलांमुळे खूप बदलेल. मोबाईल फोन आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे संपूर्ण जीवनशैली बदलून जाणार आहे. वृत्तपत्रांनाही त्यानुसार बदलावे लागेल.''

''आता वाचक हाच वृत्तपत्राचा केंद्रबिंदू बनला आहे. त्याला काय हवे ते, त्याला हव्या त्या किमतीत आणि हव्या त्या स्वरूपात देणे या पुढील काळात गरजेचे ठरणार आहे. वाचकाची गरज लक्षात घेऊनच वृत्तपत्रसृष्टीला वाटचाल करावी लागणार आहे. त्याचप्रमाणे लोकसंख्येत निम्मे प्रमाण असलेल्या महिलांना, तसेच भावी वाचक असलेल्या मुलांना विसरता येणार नाही. समाजातील प्रत्येक घटकाचा आणि वयोगटाचा विचार करून, त्यांच्या गरजा लक्षात घेऊन वाटचालीची आखणी करावी लागेल. वाचकांच्या अधिक जवळ जाणे ही भविष्यकाळाची गरज ठरणार असून, त्यानुसार आखणी करावी लागेल.''

## विशिष्ट चळवळी, विचार का निर्माण झाले हे समजून घेण्याची गरज

चिंता परतेचा इतिहास (इंटलेक्च्युअल हिस्ट्री) समजून घेणे व विशिष्ट चळवळी, विचार का निर्माण झाले, का कारणांची माहिती करून घेणे गरजेचे असल्याचे मत दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील इतिहासाचे प्राध्यापक प्रा. गो. पु. देशपांडे यांनी मोईन शाकिर स्मृती व्याख्यानमालेत 'भारतीय आधुनिकता' या विषयावर बोलताना औरंगाबाद येथे व्यक्त केले.

आधुनिकतेसंदर्भात फ्रेंच राज्यक्रांतीपासून सद्यस्थितीपर्यंतचा आढावा घेऊन ते म्हणाले की, माणूस ज्याप्रमाणे इतिहास घडवितो त्याचप्रमाणे इतिहासही माणसे घडवीत असतो, याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. इंग्रजीमध्ये इन्टलेक्च्युअल हिस्ट्री असे आपण त्याला म्हणू. यामध्ये इतिहासक्रम म्हणजे कोण कोणाच्या खांद्यावर उभा आहे, हे समजून घेणे गरजेचे आहे.

१९ व्या शतकाने प्रत्येक गोष्टीचे अगदी इतिहासाचेही शास्त्र करता येते हे शिकवले. या शतकात लोक तत्त्वज्ञान मांडत होते. भूमिका घेत होते. आधुनिकतेसंदर्भात या सर्वांचा विचार होणे गरजेचे आहे. आधुनिकता विज्ञाननिष्ठेतून निर्माण होते. त्यामध्ये प्रत्येक गोष्टीची मीमांसा करता येते. आधुनिकता हे अजर आणि अमर तत्त्व आहे. भारताची आधुनिकता असा विचार आपल्याला करता येत नाही. महाराष्ट्राची, बंगालची आधुनिकता असा विचार करावा लागतो. भिन्न नाट्य, कला, संस्कृती आणि अभिव्यक्ती एकत्र येऊन भारत हे अनेक राष्ट्रकांचे मिळून बनलेले राष्ट्र आहे.

कुलगुरू सोनवणे म्हणाले की, आधुनिकतेच्या मुळाशी बुद्धीप्रामाण्यवाद आहे. बुद्धीप्रामाण्यावादाच्या कसोटीवर घासूनपुसून मांडलेला विचार चिरंतन काळ टिकतो. समाज तो निश्चित स्वीकारतो.

## जागतिकीकरणाच्या लाटेत इंग्रजीचे स्थान महत्त्वाचे

वैश्विकीकरणाच्या युगात द्विभाषिक परिस्थिती निर्माण होत असून, त्यातील इंग्रजीचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे, असे मत उस्मानिया विद्यापीठातील इंग्रजीच्या प्राध्यापिका डॉ. कनकदुर्गा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इंग्रजी विभागाच्या व्ही. व्ही. यार्दी स्मृती व्याख्यानमालेत व्यक्त केले. अध्यक्षस्थानी कुलगुरू के. पी. सोनवणे होते.

डॉ. कनगदुर्गा पुढे म्हणाल्या की, आपण इंग्रजी का शिकतो, हे समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. यातूनच कशा प्रकारचे इंग्रजी शिकावे आणि शिकवावे यासंबंधी मार्गदर्शन मिळू शकेल. प्रा. यार्दी यांनी लिहिलेल्या 'टिचिंग ऑफ इंग्लिश लँग्वेज इन इंडिया टुडे' या ग्रंथात वर्णन केलेली परिस्थिती आजही जशीच्या तशी असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

## माहेरचा सत्कार

मधुगंध मंडळाचे संस्थापक सदस्य न्यायमूर्ती विनायकराव गोगटे यांच्या हस्ते श्री. दि. इनामदार यांचा ७४व्या वाढदिवसानिमित्त सत्कार औरंगाबादला झाला. माहेर ही वृत्ती आहे. पुरुषांनाही माहेर असते. माहेरच्यांनी केलेला सत्कार हा शब्दात सांगणे कठीण आहे, असे विचार श्री. दि. इनामदार यांनी व्यक्त केले.



इनामदार यांना समई व मानपत्र देण्यात आले. मानपत्राचे वाचन प्रशांत आडे यांनी केले. अनेक कवितांचा पहिला श्रोता होण्याचे भाग्य मला लाभले, काही कविता मी त्यांना पुन्हा पुन्हा वाचण्यास सांगत असे उद्गार विद्याभाऊ सदावर्ते यांनी काढले. श्री. दि. हे नेहमी माझ्या घरी येतात. आल्यानंतर आम्ही मनमोकळेपणाने बोलत बसतो असे विनायक गोगटे म्हणाले.

## विद्रोही सांस्कृतिक चळवळ 'अ. भा. साहित्य संमेलना'ला समांतर नाही

विद्रोही सांस्कृतिक चळवळ ही कोणत्याही एका राजकीय प्रवाहाची आघाडी नाही. ती स्वायत्त चळवळ म्हणूनच कार्यरत राहील. तसेच अ. भा. मराठी साहित्य संमेलनास ती समांतर राहणार नसून, विद्रोहीचा मुख्य प्रवाह स्वतंत्रपणेच जाईल, असे त्या चळवळीचे सरचिटणीस डॉ. भारत पाटणकर यांनी सांगितले.

सातारा येथे ९ फेब्रुवारी रोजी दोन दिवसांचे चौथे विद्रोही साहित्य संमेलन झाले. तुम्ही प्रस्थापितांच्या विरोधात असाल तर एकत्र का येत नाही, असा सवाल करता डॉ. पाटणकर म्हणाले की, भूमिकेच्या पातळीवर काहीसे मतभेद आहेत. मात्र आपापसातील सुसंवादाने दूर होऊ शकतील. पुढील वर्षी दोनऐवजी एकच विद्रोही साहित्य, कला व संस्कृती संमेलन असेल असा दावा त्यांनी केला.

विद्रोही चळवळीची स्थापना प्रस्थापितांच्या संदर्भात प्रथम नकारात्मक बाजूने पुढे गेली हे खरे आहे. पण आमचाच प्रवाह मुख्य असल्याने तो स्वतंत्रपणे जाईल. अ. भा. मराठी साहित्य संमेलनाची सावली होऊ नये. तसेच प्रस्थापितांच्या संमेलनाच्याच काळात समांतर संमेलन घ्यायचे नाही, असा धोरणात्मक निर्णय झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आगामी संमेलन फक्त विद्रोही साहित्याचे होऊ नये. तर ते साहित्याबरोबरच संस्कृती व कलांचेही व्हावे, असा निर्णय कार्यकारिणीने घेतला आहे. यातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात एक नवीन सामाजिक प्रक्रिया सुरू होईल.

नकारात्मक विरोध आणि केवळ निषेधच करण्याचा काळ संपुष्टात आणून, या साहित्य संमेलनाच्या दरम्यान नवनिर्मिती करणारा आणि नवा मानवमुक्तीचा समाज घडविण्याकडे जाणारा सशक्त प्रवाह प्रस्थापित होत आहे.

## पुस्तकाशिवाय जीवन नाही - अरुण गुजराथी

पुस्तकाशिवाय जीवन नाही. जीवनातील आचरण हे पुस्तकावरच अवलंबून आहे, असे उद्गार विधानसभेचे अध्यक्ष अरुण गुजराथी यांनी खार येथे बी. पी. एम. हायस्कूलच्या ग्रंथालय विभागाने आयोजित केलेल्या वाचक चळवळ पारितोषिक वितरण व पुस्तक प्रदर्शन प्रसंगी काढले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रफुल्लता तळपदे होत्या. गुजराथी यांनी आपल्या भाषणात पुस्तकांचे महत्त्व विशद करून चेतनेकडे जाण्यासाठी अभ्यासाची आवश्यकता आहे व हा अभ्याससुद्धा पुस्तकावरच विसंबून आहे असे सांगितले.

## द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज - साहित्य अरुंधती

युरोप-अमेरिकतील बरेच साहित्यिक विक्रम-पराक्रम अलिकडे भारतीय लेखक-कवींच्या

नावे नोंदविले जाऊ लागले आहेत. अरुंधती रॉय यांची जगद्विख्यात बुकर पारितोषिकासाठी निवड होण्याची शक्यता व्यक्त केली होतीच. अरुंधती रॉय यांच्या 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज्' या पहिल्याच कादंबरीला ब्रिटिश टीकाकारांकडून दिला गेलेला हा आंतरराष्ट्रीय सन्मान, भारतीयांना अभिमान वाटावा असा खचितच आहे. रॉय यांच्या पुस्तकाशी स्पर्धा करणारे बरेच कथा-कादंबरीकार होते आणि 'अंतिम फेरी'तील बाकी पाचजण युरोपातलेच होते. असे असूनही रॉय यांच्या कादंबरीची निवड व्हावी, हे विशेष आहे. भारतातील अनेक भाषांतील प्रतिथयश लेखकांना सध्याच्या या युरोप-अमेरिकेतील भारतीय साहित्याविषयीच्या 'वेडा'बद्दल आश्चर्य व कुतूहलही वाटणे स्वाभाविकच आहे. सलमान रश्दी आणि विक्रम सेठ यांनी तर अक्षरश: जागतिक साहित्य साम्राज्यावर झेंडा फडकाविला आहे. सुमारे २५ वर्षांपूर्वी रूथ प्रावर झाबवाला यांचे नाव असेच झळकत असे. पण त्या भारतीय नव्हत्या. त्यांचा विवाह भारतीय तरुणाबरोबर झाला होता आणि त्यानंतर त्यांना आलेला 'भारतीय' अनुभव त्यांनी पाश्चिमात्य रसिकांना समजेल-भावेल-रुचेल अशा भाषेत मांडला होता. याउलट व्ही.एस.नायपॉल या जगप्रसिद्ध लेखकाचा वारसा अस्सल भारतीय, पण त्यांनी जीवन व्यतीत केले कॅरिबियन बेटांवर आणि पुढे युरोप-अमेरिकेत. नायपॉल यांना भावलेला भारतही जीवनाचे विविध रंग उधळतो. हे सर्व साहित्यिक, वाचकाला एखाद्या विशिष्ट कुटुंबात, खेड्यात वा प्रसंगांच्या झपाटून टाकणाऱ्या मालिकेत घेऊन जातात. त्या परिसरातील राजकीय-सामाजिक उलथापालथींच्या पार्श्वभूमीवर तेथील माणसांचे परस्परसंबंध, त्यांच्यातील भावनिक गुंता, स्त्री-पुरुषसंबंधातील नैतिक- पारंपरिक बंधने आणि कंगोरे हे सर्व उलगडून दाखविणारे हे साहित्य आहे त्याच्या परिणामी सलमान रश्दी, विक्रम सेठ, अरुंधती रॉय, अमिताव घोष, गीता मेहता प्रभृतींना हे यश मिळत आहे की, खरोखरच त्यांचे साहित्य त्यांच्या समकालीन-स्पर्धकांपेक्षा अधिक उंचीचे आहे, हे येथे बसून ठरविणे कठिणच जाईल; कारण अंतिम फेरीत आलेल्या साहित्यिकांचीही पुस्तके येथे उपलब्ध नसतात. अरुंधती रॉय यांनी केरळमधील एका कुटुंबाचे वेधक चित्रण केले आहे. परंतु ते त्या कुटुंबातील व्यक्तींच्या भावविश्वापुरते मर्यादित नाही. काही छिद्रान्वेषी टीकाकारांनी, त्या कादंबरीतील कथा-विशिष्ट लैंगिक संबंधाकडेच लक्ष वेधून त्या पुस्तकावर बंदी घालण्याचीही मागणी केली होती. काहींनी तर खटलाही लावला आहे. अरुंधती रॉय यांची ही कादंबरी जरी पहिलीच असली, तरी गेली १०-१५ वर्षे त्या साहित्यविश्वात होत्याच. मात्र त्यांचे लेखन मुख्यत: दूरचित्रवाणी वा चित्रपटांच्या कथा-पटकथा-संवाद लेखनापुरतेच मर्यादित असे. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराची रक्कम २० हजार स्टर्लिंग पौंड (सुमारे १२ लाख रुपये) आहे. आता या कादंबरीची युरोपातील अन्य भाषांमध्ये भाषांतरे होतील. एक गोष्ट मात्र लक्षात ठेवायला हवी, ती ही की हे सर्व सन्मान मूळ इंग्रजीतून लिहिलेल्या भारतीय साहित्याला मिळत आहेत; भारतीय भाषांमध्ये प्रसिद्ध झालेल्या अभिजात साहित्याच्या इंग्रजीतील अनुवादाला नव्हे. शेवटी साहित्याचे माध्यम भाषा हे आहे आणि अनुभवाची खोली, तीव्रता आणि झेप मातृभाषेतच अधिक उत्कटतेने व्यक्त होऊ शकते. त्यामुळे याच दर्जाचे साहित्य मराठीत तसे दिसत नसले, तरी अन्य भारतीय भाषांमध्ये कदाचित ते असूही शकेल!

(बुकर पुरस्काराची घोषणा झाल्यानंतरचे महाराष्ट्र टाइम्समधील संपादकीय)



**येळ्ळूरमधील दुसरे मराठी साहित्य संमेलन अभूतपूर्व उत्साहात**

साहित्य संमेलन म्हणजे विचार आणि संकल्पाचे व्यासपीठ. विचाराशिवाय या देशाला भवितव्य नाही. ज्ञानेश्वरपूर्व काळापासून ग्रामीण साहित्याची परंपरा आहे. मात्र ग्रामीण माणसाचं प्रतिबिंब असणाऱ्या या साहित्याला तोडून टाकण्यात आलं होतं. या संमेलनाद्वारे येळ्ळूरवासियांच्या रक्ताच्या थेंबाथेंबात मराठीपण सळसळते आहे. माणूस मराठीपणासाठी कसा पोरका होता, याची जाणीव येथील घोषणातून, आक्रोशातून जाणवली. महाराष्ट्राचा वारसदार आपणास येळ्ळूरमध्ये पाहण्यास मिळाला, असे गौरवोद्गार येळ्ळूर येथील दुसऱ्या मराठी साहित्य संमेलनात डॉ.आनंद यादव यांनी अध्यक्षपदावरून काढले.

संमेलनाची सुरुवात सकाळी ग्रंथदिंडीने झाली. 'महाराष्ट्र राज्य येळ्ळूर' या ऐतिहासिक नामफलकाजवळ गावच्या वेशीत साहित्यिक, कवी आणि मान्यवरांचे आगमन झाले.

'महाराष्ट्र राज्य' फलकाचे पूजन संमेलनाध्यक्ष आनंद यादव यांच्या हस्ते करण्यात आले.

ग्रंथदिंडीचे पूजन प्रसिद्ध उद्योजक सुरेश हुंदरे यांच्या हस्ते करण्यात येऊन दिंडीस सुरुवात करण्यात आली. दीड किलोमीटर अंतरात मराठीप्रेमींची अपूर्व उपस्थिती होती.

दिंडीसमोर मराठमोळ्या संस्कृतीचे दर्शन घडविणारे मावळे, पंचारती घेऊन निघालेल्या विद्यार्थिनी, छ. शिवराय, नेताजी सुभाषचंद्र बोस, स्वामी विवेकानंद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू आदी राष्ट्रपुरुषांच्या केलेल्या आकर्षक वेशभूषा केलेले विद्यार्थी होते.

संमेलनस्थळी मांडण्यात आलेल्या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन लायन्स क्लबचे अध्यक्ष अप्पासाहेब गुरव यांच्या हस्ते करण्यात आले. सभामंडपाचे उद्घाटन पायोनियर अर्बन बँकेचे अध्यक्ष चंद्रकांत ग्रंडकल यांनी व व्यासपीठाचे उद्घाटन खनिज उद्योजक मल्हारी बाबुराव पाटील यांनी केले.

अशोक याळगी प्रास्ताविक करताना म्हणाले, जत्रा-यात्रा भरविण्यापेक्षा अशा प्रकारची साहित्य संमेलने भरावीत, अशी नागरिकांची धारणा आहे. येथील मराठी जनता गेली ४५ वर्षे महाराष्ट्रात जाण्यासाठी झगडते आहे. कन्नड सत्तेच्या वरवंट्याखाली मायमराठी तळमळते आहे. मायमराठीची पणती तेवत ठेवण्यासाठी अशी संमेलने आवश्यक आहेत.

स्वातंत्र्य मिळवूनदेखील ग्रामीण माणसे उपेक्षित आहेत. यासाठी लेखकांना उद्देशून यादव म्हणाले, केवळ कवितेतून रमू नका. वैचारिक लेख लिहून आपल्या योग्य मागण्या मांडा. ग्रामीण भाग एकत्र आल्याशिवाय परिवर्तन होणार नाही. केवळ मनोरंजन करणारा कवी नको आहे. कुसुमाग्रजांसारखा साहित्यिक निर्माण झाला पाहिजे.

डॉ. यादव यांच्या हस्ते प्रा.ना.रा. काटकर, लेखक नारायण अतिवाडकर, चांगळेश्वरी विश्वस्त समिती अध्यक्ष नारायणराव कंग्राळकर आणि दै. 'तरुण भारत'चे येळ्ळूरचे वार्ताहर उदय जाधव यांचा सन्मान करण्यात आला. माजी मुख्याध्यापक जी.पी.कुगजी यांनी आभार मानले.

**हा तर खेड्यातल्या न संपणाऱ्या अनुभवांचा गौरव : ना. धो. महानोर**

सात जन्म घेतले तरी खेड्यातील अनुभव संपणारे नाहित. त्या न संपणाऱ्या अनुभवांचा

हा गौरव आहे. शिवार प्रतिष्ठानचा हा सोहळा म्हणजे खेड्याच्या संस्कृतीचा गौरव आहे. असे ना.धो. महानोर यांनी शिवार शेतकरी साहित्स पुरस्कार वितरण सोहळयाचे वेळी म्हटले.

शिवार प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. यावर्षी हा पुरस्कार नारायण सुमंत यांना महानोर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानी सकाळचे कार्यकारी संपादक यमाजी मालकर होते. आपल्या भाषणात ना.धों महानोर यांनी केलेले मुक्तचिंतन अनेकांना सुखावून गेले. निसर्गावर विपूल लेखन झाले, पण निसर्ग कधी जुना झाला नाही. 'वृक्षवेद'मध्ये जो निष्पर्णपणा आहे तो नारायण सुमंत यांनी कवितेतून मांडला. सुमंतचा सत्कार म्हणजे माझाच सत्कार आहे असे मी मानतो असेही महानोर यावेळी म्हणाले.

ग.ह. पाटलांची 'रानजाई', ग.ल. ठोकळांची 'मीठ-भाकर', बी. रघुनाथ यांची 'उन्हात बसली न्हात' यासारखी रचना मराठीतील अस्सल कवितेची सुरुवात आहे. या कवितेच्या परंपरेत, त्या आनंदी वातावरणातून आम्ही पुढे आलो, असेही महानोर म्हणाले.

सत्काराला उत्तर देताना नारायण सुमंत म्हणाले, शेतकरी या व्यवसायाचा मला रास्त अभिमान आहे. त्या काळात मी १९७८ ला भारत पेट्रोलियमचा लेखाधिकारी म्हणून आलेला 'कॉल' अजून जपून ठेवला आहे. कारण मी अपघाताने शेतकरी झालो नाही तर स्वाभिमानाने झालो आहे.

### येणाऱ्या बदलांमधील कोलाहल लेखकांनी टिपावा -महावीर जोंधळे

सुशिक्षित तरुण चांगली पदवी घेऊन बाहेर येतात आणि नोकरी मिळत नाही म्हणून पानठेल्यावर बसतात. त्यावेळी त्यांच्या मनातील कोलाहल नव्या लेखकांनी सहजपणे टिपायला हवा, असे मत महावीर जोंधळे यांनी मांडले.

शिवार प्रतिष्ठानच्या वतीने ज्येष्ठ साहित्यिक व राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष रा.रं. बोराडे यांच्या षष्ठ्यपूर्तीनिमित्त आयोजित नव्या लेखकांच्या लेखनकृतीवर भाष्य या कार्यक्रमात ते बोलत होते.


ते पुढे म्हणाले, आज प्रश्न बदलले आहेत, जागतिकीकरणाने जगण्याचे संदर्भ बदलू घातले आहेत, अशावेळी लिहिणाऱ्यांसाठी असंख्य विषय धगधगत समोर येत आहेत. ते टिपून डोळसपणे लिहिण्याची तरुण लेखकांकडून अपेक्षा आहे.

प्रत्येक लेखक स्वत:च्या लेखणीने मोठा होतो. त्याला प्रोत्साहन मिळावे म्हणून पालकत्व स्वीकारणे हे एक निमित्त आहे, अशा शब्दात नम्रपणे आयोजनाची भूमिका रा.रं.बोराडे यांनी व्यक्त केली. प्रारंभी शिवार प्रतिष्ठानचे सचिव डॉ.नीलकंठ डाके यांनी स्वागत केले.

पुण्याचे डॉ. कमलेश यांनी ललिता शिंदे व रवींद्र पांढरे यांच्या कथेवर भाष्य केले. अंतर्मुख करणाऱ्या या दोघांच्या कथांना चांगले भवितव्य आहे, असे ते म्हणाले. मानवतचे डॉ. प्रकाश मेदककर यांनी महेश मोरे व विजय जावळे यांच्या कथांवर भाष्य केले. ते म्हणाले, अनुभवाचा सच्चेपणा असणाऱ्या या कथा स्वतंत्र वाट चोखाळणाऱ्या आहेत. ग्रामीण अस्सल अभिव्यक्ती, त्यातील प्रादेशिकता यातून येणाऱ्या चांगल्या कथा त्यांच्याकडून वाचायला मिळतील.

जालन्याचे प्रा. केशव सखाराम देशमुख यांनी संतोष जगताप, आसाराम कुटे, ललित आधाने, व सुरेश माहिते या चौघांच्या कवितांवर भाष्य केले.






### फ. मुं. शिंदे, अशोक परांजपे यांना पुरस्कार

औरंगाबादच्या मराठवाडा कला विकास महामंडळातर्फे प्रतिवर्षी मराठवाडा पातळीवरील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. या वर्षासाठी प्रा. फ. मुं. शिंदे (साहित्यक्षेत्र), प्राचार्य प्रताप बोराडे (प्रशासन क्षेत्र), मधुकरअण्णा मुळे (शिक्षण व उद्योग क्षेत्र), पन्नालाल सुराणा (सामाजिक क्षेत्र), अशोक परांजपे (कला क्षेत्र), आदींची पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याची घोषणा महामंडळाचे अध्यक्ष प्राचार्य अशोक तांबटकर, सचिव प्रल्हाद शिंदे यांनी केले.

### आकाशानंद यांना जीवनगौरव पुरस्कार

पुण्यातील चिन्मय कम्युनिकेशन्स या प्रकाशन संस्थेचा प्रसारमाध्यमविषयक पहिला जीवनगौरव पुरस्कार मुंबई दूरदर्शनच्या 'ज्ञानदीप' या लोकप्रिय कार्यक्रमाचे निर्माते व ज्ञानदीप महामंडळाच्या महासंघाचे संस्थापक आकाशानंद यांना जाहीर झाला आहे. गौरवचिन्ह, सन्मानपत्र, रोख रक्कम (लोकनिधी), शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.


यानिमित्त आकाशानंद गौरवनिधीसाठी व्यक्ती व संस्थाकडून योगदान अपेक्षित आहे. पत्ता- आकाशानंद गौरवनिधी, द्वारा - फ्लॅट क्र. ५, विद्याश्री, ५७३/२०, बिबवेवाडी, पुणे ४११०३७.

### 'नाटक जगविण्यासाठी मराठी भाषा जिवंत ठेवायला हवी'

रंगत संगत प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा माधव मनोहर पुरस्कार श्री. नाडकर्णी यांना राजेंद्र बनहट्टी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. 'सकाळ'चे वृत्तसंपादक सुरेशचंद्र पाध्ये, व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर या प्रसंगी उपस्थित होते. नाडकर्णी म्हणाले, की नाटक चालावे किंवा पडावे यासाठी समीक्षा लिहिली जात नसून त्यामागे प्रेक्षकांचा नाट्यविषयक दृष्टीकोण प्रगल्भ व्हावा हा हेतू असतो.

### आंतरराज्य दिवाळी अंक स्पर्धा पुरस्कार वितरण समारंभ

चिन्मय कम्युनिकेशन्सच्या आंतरराज्य खुल्या दिवाळी अंक स्पर्धेचा पुरस्कार वितरण समारंभ ज्येष्ठ पत्रकार सुरेशचंद्र पाध्ये यांच्या हस्ते पार पडला. आनंद गंधाली (मुंबई), देवगिरी तरुण भारत (औरंगाबाद), साधना (पुणे), धर्मभास्कर (मुंबई) व विपुलश्री (पुणे) या दिवाळी अंकांना स्मृतिचिन्हे व प्रमाणपत्रे देण्यात आली.




पुस्तक परिचय

# एकवचनी

## १५००वर प्रश्नांची उत्तरे देणाऱ्या बाळासाहेब ठाकरे यांच्या ५२ बिनधास्त मुलाखती

लेखक : **संजय राऊत**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे 'सामना'चे संपादक, आणि १९९४ पासून संजय राऊत हे कार्यकारी संपादक आहेत. बाळासाहेबांना दैनिकाच्या दैनंदिन कामकाजाकडे पाहण्याएवढी उसंत मिळणे अशक्यच; त्यामुळ कार्यकारी संपादक जो कोणी असेल त्यालाच बाळासाहेबांची मानसिकता लक्षात घेऊन, त्यांच्या मनातले जाणून रोजच्या रोज अग्रलेखाची 'लाईन' ठरवणे क्रमप्राप्त असते. संजय राऊत यांनी बाळासाहेबांच्या वृत्तीप्रवृत्तीला साजेलसे स्वत:चे व्यक्तिमत्व 'सामना'ची सूत्रे हाती आल्यावर घडवले आहे. सामना वाचला जातो तो शिवसेनेचे मुखपत्र म्हणून; बाळासाहेबांच्या मतांचे व्यासपीठ म्हणून! कार्यकारी संपादकाच्या वैयक्तिक मतांसाठी सामना कोणी वाचावा अशी अपेक्षाही नसते. त्यामुळे बाळासाहेब ठाकरे यांच्याच भूमिकेत शिरून, त्यांच्याच भावभावनांना व धोरणात्मक व्यूहाला संपादकीय शब्दरूप देण्यातील कौशल्य उत्तम प्रकारे संजय राऊत यांनी प्रकट केले आहे; आणि बाळासाहेबांना रुचेल, शोभेल अशीच शैली घडवली आहे. क्वचितच कधी बाळासाहेबांची त्यांच्यावर खप्पामर्जी झाली असेल; इतक्या दोघांच्या वेव्हलेंग्थज् जुळलेल्या आहेत.

बाळासाहेबांना शोभतील असे विचार बाळासाहेबांना शोभेल अशा आक्रमक शैलीत मांडण्याची ही कसरत संजय राऊत गेली सातआठ वर्षे करीत आहेत. तरीही बाळासाहेबांची त्या त्या वेळची मते ही शिवसैनिकांना व इतर पक्षांच्या कार्यकर्त्यांना त्यांच्याच ठाकरी भाषेत हवी असतात. ही वाचकांची गरज लक्षात घेऊन संजय राऊत यांनी बाळासाहेबांच्या विस्तृत मुलाखती महिन्या-दोन महिन्याने सामनात देण्याचा परिपाठ ठेवला. इतर कोणीही घेऊ शकणार नाही असं स्वातंत्र्य संजय राऊत यांनी या मुलाखतींच्या बाबतीत घेतले आणि बाळासाहेबांना अडचणीचे वाटणारे प्रश्नही विचारले आहेत. बाळासाहेबांनीही हे प्रश्न संजय राऊत यांच्या मनातले नाहीत, सर्वसामान्य मराठी माणसाचे आहेत असे समजून उत्तरे देऊन, सरसहा हाताळले, क्वचितच उत्तर देण्याचे त्यांनी टाळले, किंवा क्वचितच प्रश्नांना बगल दिली असे दिसते.

एखाद्या दैनिकात संपादकाच्याच मॅरेथॉन मुलाखती वरचेवर येणे हा एकूण चमत्कारिकच



## हे पुस्तक का वाचावे?

१) शिवसेनाप्रमुखांच्या मानसिकतेचे दर्शन घडवणाऱ्या बिनधास्त मुलाखती.
२) अडचणीचे व अवघड प्रश्न विचारण्याचे संजय राऊत यांचे धाडस.
३) गेल्या १५ वर्षातील शिवसेनेच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख.
४) बाळासाहेबांच्या ठाकरी भाषेचा ठसका.
५) विनोदाचे हत्यार वापरण्याची ठाकरे यांची हातोटी.

प्रकार. पण 'सामना'चे वैशिष्ट्य म्हणून त्याचा उल्लेख होऊ लागला.

बाळासाहेबांचा बाणा रोखठोक बोलण्याचा! तशात मराठीचा घणाघाती वापर करण्याचा त्यांचा स्वभाव. मुलाखतीत बोलताना एखादी शिवी वा बदनामीकारक विधान तोंडातून गेले तरी ते जसेच्या तसे छापा असा बाळासाहेबांचा आग्रह. त्यामुळे संजय राऊत यांच्या प्रश्नातही आडपडदा वा हातचे राखून न ठेवणे हा प्रकार नाही. त्यामुळे या मुलाखती वादळी व वादग्रस्तही ठरल्या.

संजय राऊत यांनी बाळासाहेबांच्या एकूण ५२ मुलाखती त्यांच्या साठी ते पंच्याहत्तरीच्या पंधरा वर्षांत घेतल्या. पहिल्या दोन मुलाखती अनुक्रमे १९८७ व १९९२ मधील आहेत. परंतु पुढच्या पन्नास मुलाखती १ मे १९९४ पासून ३ जुलै २००१ या सात वर्षातल्या आहेत. त्यात त्या त्या वेळच्या ज्वलंत समस्यांबाबतची बाळासाहेबांची मते त्यांच्या आक्रमक शैलीत व्यक्त झाली आहेत.

माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी या पुस्तकाला प्रस्तावना लिहिलेली आहे. ''या मुलाखती सर्वंकष आहेत. शिवसेनेची धोरणे, शिवसेनेचे आचारविचार, शिवसेनेच्या अपेक्षा सारे काही सांगणाऱ्या आहेत... या मुलाखती म्हणजे शिवसेनेची घटनाच! ५२ हिऱ्यांचा हार... या मुलाखतींमधून शिवसेना समजते, शिवसेनेचा इतिहास समजतो, शिवसेनेचे मन समजते, शिवसेनेचा भविष्यकाळ कळतो, बाळासाहेबांचे पारदर्शक व्यक्तिमत्त्व... त्यांचा राग, लोभ, चीड, देशभावना, प्रखर राष्ट्रवाद सारे एकत्र पाहायला मिळते... संजय राऊत यांचे प्रश्न धाडसी, चिडवणारे, माहिती काढणारे, गौप्यस्फोट करायला लावणारे, संतापजनक- सर्व प्रकारचे आहेत. बाळासाहेबांच्या 'मातोश्री' गुहेतून संजय राऊत सुखरूप बाहेर आले ही सुद्धा त्यांच्यावरील आई भवानीचीच कृपा म्हटली पाहिजे.''

**सामना काढण्याचे कारण**

एखादे वृत्तपत्र हाताशी असण्याची गरज शिवसेनेला व बाळासाहेबांना भासली; त्याबद्दल

ते स्वत:च म्हणतात,''मला माहित आहे की शिवसेनेबद्दल दातओठ खाणारे लोक भरपूर आहेत, आणि माझ्या हातात वृत्तपत्र नसेल तर मात्र ही लोकं मला कच्चा खातील. माझं काहीच छापून येणार नाही. माझे विचार येणार नाहीत. माझा प्रचार होणार नाही आणि मला सर्वत्र तोंडघशी पाडतील. मी कसा उपडा होईन हेच पाहतील म्हणून मला वृत्तपत्र काढावं लागलं.''(२३५)

''सामना हा सर्वांना पुरून उरतोय, हिंदुस्थानभर त्याची दखल नाही म्हटलं तरी घ्यावीच लागते.'' असे समाधानही त्यांना वाटते.(२७५)

**विनोदाचे मर्मभेदक शास्त्र**

या मुलाखतींचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे बाळासाहेब ठाकरे यांच्या विनोदी शैलीचे कधी नाजूक तर कधी मर्मभेदक आघात. बाळासाहेब विनोदाचे हत्यार कुशलतेने वापरतात. कोणाला मैद्याचे पोते किंवा कांद्याचे पोते म्हणून ते हास्यास्पद करतात तर कधी ''शरद पवारांनी आता लोणची घालावीत व मसाला पुरवावा यापेक्षा दुसरा धंदा नाही राहणार त्यांच्याकडे... आम्ही त्यांचे लोणचे घातले, त्यांनी ते विकावे.''(पृष्ठ २६९) यासारखी खिल्ली उडवतात.

''काही पत्रकार राष्ट्रसेवादलवाले आहेत की ज्यांना स्वत:लाही मूल होत नाही आणि दुसऱ्याला झालेलं त्यांना आवडत नाही. अशा प्रवृत्तीचे काही लोक आहेत. त्यांच्याबद्दल आम्ही काय करायचं?''(पृष्ठ २३४) असे मर्मावर बोट ठेवतात. किंवा ''कौटुंबिक माझं चांगलं चाललंय की, अजूनही बायकोच्या डोक्यात माझ्याशी घटस्फोट घेण्याचा विचार आलेला नाही.'' ''एकदा गर्भपात झाल्यावर आता आशा सोडा, हे धंदे कशाला, प्रयत्न करा नाहीतर नपुंसक म्हणून समजा.''(पृष्ठ ३१) (ही मुलाखत १९९२ मधील आहे.) ''मी नक्की केव्हा मरणार हे ठरलं नसल्यामुळं वारसदारी ठरविण्याची आता काही जलदी किंवा निकड आहे असे मला वाटत नाही. हा प्रश्न एकदा पवारांना विचारून बघा. नरसिंहराव, वाजपेयी किंवा अडवाणींना विचारा... किती लोक माझ्या पिंडाला शिवण्यासाठी टपून बसले आहेत याची कल्पना मला आहे.'' अशी तिखट प्रतिक्रियाही ते वारसदाराच्या प्रश्नावर व्यक्त करतात.(पृष्ठ ३२)

**विषयांची विविधता**

या मुलाखतींच्या रूपाने बाळासाहेबांनी दीडहजारावर प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. शिवसेना, हिंदुत्व, सरकार, भाजपा, समाजवादी, काँग्रेस, विरोधी पक्ष, निवडणुका, मतदार, दौरे, शिवसेनेतील फाटाफूट, बंडखोरी, भाजपा-शिवसेनेतील तणाव, पत्रकारिता, मीडिया, कामगारक्षेत्र, राज्यघटना, लोकशाही, खंडणी, दहशत, गँगवॉर,भ्रष्टाचार, ठाकरे यांच्या कुटुंबातील वाद, अवैध मार्गाने संपत्तीची जमवाजमव, शिवसैनिकांचे वर्तन, मुंबईचे मराठीपण, झोपडपट्ट्या, भूमिपुत्रांवरील अन्याय, त्या त्या वेळचे राजकीय वातावरण व गणित, गोवारींचे हत्याकांड, दंगली, बॉंबस्फोट, देशाचे नेतृत्व, रिमोट कंट्रोल, शेतमालाचे भाव, श्रीमंतांचे मित्र झाल्याचा आरोप, नोकरशाहीचा नाकर्तेपणा, राजकीय संन्यास, कुपोषणाने मृत्यू, कॉन्व्हेंट शाळा, महागाई, आर्थिक दिवाळखोरी, पक्षहिंसा, पाकिस्तान, काश्मीर, कारगिल, श्रीलंकाव लिट्टे, दुकानांवरील मराठी पाट्या, ख्रिस्ती मिशनरी, मुसलमानांचा मताधिकार काढून घेण्याचा आग्रह, तहलका, इस्लामचे आक्रमण, मणिपूरमधील बंड, एन्रॉन, श्रीकृष्ण आयोग, राज-उद्धव यांचे संबंध, नेपाळमधील राजवंश हत्या इ. कितीतरी विषय या मुलाखतींमध्ये आले आहेत. विषय पुन:पुन्हा आले आहेत. स्वत:बद्दल



सुद्धा ठाकरे यांनी वेळोवेळी काही बोलकी विधाने केली आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगवेगळे पैलू त्यातून स्पष्ट होतात.

**आज जे काही आहे ते नशिबानं**

या पुस्तकातील अगदी शेवटच्या मुलाखतीत (३ जुलै, २००१) ठाकरे यांना 'कुटुंबप्रमुख म्हणून तुम्ही किती यशस्वी झालात'असा एक प्रश्न विचारला गेला आहे. त्याचे उत्तर देताना बाळासाहेब म्हणतात,''-मला असं वाटतं, की कुटुंबप्रमुख म्हणून सुद्धा मी माझी भूमिका निभावलेली आहे. नशिबानं मला माँसारखी पत्नी मिळाली ...अर्धांगिनी म्हणून तिने मला मोलाची साथ दिली... स्वत:च्या बायकोशी भांडण, तंटा, मारणं... तसला प्रकार माझ्या आयुष्यात मी कधीच केला नाही. ४८ वर्षांत मी माझ्या पत्नीच्या अंगाला कधी चपराक वा कडाडणं असं केलं नाही... छानछोकी आम्हाला कधी जमली नाही. आणि अशा आयुष्यामध्ये आज जे काही आहे ते नशिबानं... म्हणून तर आम्ही इथपर्यंत पोचलो. नाहीतर कोण आम्ही? अशा वेळेला माझ्या नातवंडांना जे मला देता येईल, करता येईल तेवढं मी करत असतो... उद्याचं मी काही सांगू शकत नाही. मुले राजकारणात आलीत. त्यांची बरीच चाल व्हायची आहे... एक ओघ असतो. तेव्हा माणूस खपून जातो. मग त्याला आवडतही नाही तो प्रकार. राज हा व्यंगचित्रकार. तो व्यंगचित्रात रमण्यापेक्षा राजकारणातच जास्त रंगायला लागलाय. मी त्याला गमतीनं म्हणतो,'अरे बाबा, मी आधी व्यंगचित्रकार होतो आणि मग शिवसेनाप्रमुख झालो. तू उलटा प्रकार करतो आहेस...' '' (४८१-२) (२१३-४)

**शिवसेनेने मराठी माणसाच्या आयुष्याला दिशा दिली**

शिवसेनेची स्थापना हा एक अपघात होता. ''नशिबात असतात काही काही गोष्टी, त्या होऊन जातात त्या त्या पद्धतीनं. मला तरी काय वाटलं होतं, की मी व्यंगचित्रकाराचा शिवसेना प्रमुख होईन म्हणून? झालो. आपलं पुढचं आयुष्य काय आहे? कोणी लिहून ठेवलयं का की आता काय करायचं?... शिवसेनाप्रमुख म्हणून इतक्या पद्धतीनं यशस्वी झालो. लोकांनी मला जवळ केलं... कवटाळलं. विचार मांडले आणि मी तेवढाच पारदर्शक राहिलो. विचारांशी व्यभिचार नाही केला... एवढं तर नक्कीच की शिवसेनेने मराठी माणसाच्या आयुष्याला दिशा दिली... नाही तर उद्‌ध्वस्त झालो असतो. आणि ध्येयपूर्ती म्हणाल तर ती कधीच होत नसते. नवीन नवीन प्रसंग उभे राहत असतात, त्यांना सतत तोंड द्यावं लागतं.'' (४८१)

**मी बोललो आणि त्याप्रमाणे घडलं आहे.**

''माणसांवरचाही माझा विश्वास उडत चाललेला आहे. एक संन्याशी वृत्ती माझी वाढत चाललीय. सर्व सोडून दूर जावे असं वाटतं... मी कधीही तो प्रकार करीन माझ्या आयुष्यामध्ये. जर सर्वत्रच अतिरेक मला दिसू लागला तर. म्हणजे देशात लोकांचा जसा उठाव व्हायला पाहिजे तसा तो होत नाही. उठाव होतो पण तो पुंजक्यापुंजक्याने होतो. म्हणजे गोरासाहेब जाण्यासाठी सारा देश पेटून उठला होता. ते चित्र आज उभं राहायला पाहिजे. ती सगळी माणसं आहेत. सगळी बुजुर्ग. बुजगावणी. ती नष्ट व्हायला पाहिजेत. तरच देश सुधारेल... चिंतन मनन चालू असतं... त्यातून काही मार्ग सुचत असतात. स्वप्नांमध्ये सुद्धा माझी काही रिडल्स सोडविली जातात... अंतर्ज्ञान किंवा इंटिमेशनचे प्रकार होतात माझ्याबाबतीत कधी कधी. मी बोलतो आणि त्याप्रमाणे घडलेलं आहे... मला वाटतं, एक प्रकारची ती लहर असते. लहर म्हणजे वेव्हज् ,

व्हायब्रेशन, कंप.'' (२११-१३) ''मला मृत्यूची पर्वा नाही. फक्त मृत्यू यावा तो मर्दाचा असावा.''(९७)

**खंडणी : मुळात किती? आमच्या नावावर किती?**

या मुलाखतींमधून आपल्या सर्वच प्रश्नांची, समाधानकारक किंवा मनासारखी उत्तरे मिळावीत ही अपेक्षा करणे योग्य नाही. पारदर्शकतेलाही व्यावहारिक मर्यादा असतात. त्यामुळे काही ठिकाणी 'बीटवीन द लाइन्स' वाचावे लागते. तशा जागाही खूप आहेत, आणि त्या अर्थपूर्ण, मार्मिक आहेत. ''आम्ही मुंबई एके मुबई करीत बसलो का? तर ती महाराष्ट्राची राजधानी आणि मुबईचेच प्रश्न आमच्याकडे सातत्याने येत गेल्याने आमचं फिरणं इकडेच जास्त झालं... पैशाच्या अभावी आम्हाला फारसं पसरताच आलं नाही. पसरलो पसरलो ते आम्ही ठाण्यापर्यंत आणि लांबची उडी म्हणजे पुण्यापर्यंत... पक्ष बांधून निवडणुका लढवायच्या आहेत, सत्ता हाती घ्यायची आहे हे चित्रं नव्हतचे आमच्यासमोर...''(५२, ३ मे, १९९४)

खंडणीबाबत विचारलेल्या प्रश्नांना बाळासाहेब उत्तर देतात ''खंडणी हा शब्द आता त्यांना सापडलाय. पूर्वीही खंडण्या चालू होत्या. कॉंग्रेसवाल्यांच्या. अगदी याच पद्धतीनं चालू होत्या... त्यामानानं आम्ही अद्याप काहीच केलेलं नाही... आमच्या नावानं जर कोणी असले धंदे करीत असतील तर त्यांना सरळ पोलिसांच्या ताब्यात द्या. नक्की कोण कुठे आमच्या नावावर खंडण्या वसूल करतंय ते कळायला काय मार्ग आमच्याकडे?... खंडणी प्रकरणात तथ्य किती, सत्य किती ते काही बघणार आहात की नाही?... त्यामुळे मुळात किती, आमच्या नावावर किती? नावावर काही असेल तर त्याची आम्ही पर्वा करीत नाही.''(१३३-३४ १९ आगस्ट,१९९६).

''ही जी कोणी पुष्पा भावे नावाची बाई आहे तिला दरवेळेस आमच्या विरोधात कुठची ना कुठची अवदसा आठवते आणि थयथय नाचायला लागते. तिने जे काही माझ्यावर बेनामी संपत्तीचे आरोप केले आहेत त्यावर मला तिला इतकंच सांगायचं आहे, की बये, माझी जिथे जिथे म्हणून प्रॉपर्टी असेल, मग ती बेनामी असेल किंवा आणखी काही, ती माझ्याकडे घेऊन ये. कागदोपत्री त्याच्यावरती सही करून तुला मी फुकटात देऊन टाकतो.''(१६९)

''मी मतदानाच्या पेटीतून निवडून आलेला प्रतिनिधी नाही, लोकांच्या प्रेमावर, श्रद्धेवर मी टिकून आहे,''(२८०)

''माझा मुख्यमंत्री प्रो-पवार असेल तर मला मुख्यमंत्र्याचा विचार करावा लागेल... शेवटी मारक ठरणाऱ्या माणसाशी तुमच्या दोस्त्या, हे कसं काय जमणार? मी इथे रक्त आटवायचं आणि तुम्ही प्रो प्रो करीत त्यांची जवळीक करायची. मग घालवलंत कोणाला तुम्ही?''(२८३)

''कॉंग्रेसचं जातीय राजकारण मोडून काढणार? ते पुढचे पत्ते आहेत. गनिमी कावे जाहीर करायचे नसतात.''(२८९)


''माझे डाव मी माझ्या पद्धतीने खेळणार. ज्या वेळेला फटका बसेल तेव्हा बसेल.''(२९२)

असं खूप काही या मुलाखतीतून समोर येतं. ते विचारांना चालना देतं.

**किंमत : ३५० रु. सवलतीत : २८० रु.**

**सभासदांना : २६३ रु. पोस्टेज : २५ रु.**






# द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज

## पहिल्याच कादंबरीने केलेला विश्वसंचार

मूळ लेखिका : **अरुंधती रॉय**

अनुवाद : **अपर्णा वेलणकर**

अरुंधती रॉयने केवळ भारतीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय वाड्‌मयीन क्षेत्रात मोठीच खळबळ उडवून दिली, यात शंका नाही.

पहिल्याच कादंबरीने तिला दहा लाख डॉलर- साडेतीन कोटी रुपये मानधनापोटी मिळवून दिले. एवढी मोठी रक्कम यापूर्वी कोणाही कादंबरीकाराला मिळालेली नव्हती. प्रथम प्रकाशनाच्या वेळीच कादंबरी अनेक देशांत व अनेक भाषांत होण्याबाबतही तिने विक्रम प्रस्थापित केला.सहा महिन्यांत तिच्या दहा लाखांवर प्रती खपल्या. भारतातही हार्डकव्हरमध्ये सहा आवृत्त्या निघाल्या. बेस्टसेलर यादीत सतत नाव झळकत राहिले आणि या सगळ्यावर कळस चढविला तो इंग्लंडमधल्या अत्यंत प्रतिष्ठेच्या अशा बुकर पुरस्काराने! १९८१ मध्ये सलमान रश्दी याला हा पुरस्कार 'मिडनाईटस् चिल्ड्रेन' कादंबरीला मिळाला होता. त्यानंतर सोळा वर्षांनी हा सन्मान पुन्हा भारताला लाभला.

पस्तिशीतल्या एका भारतीय तरुणीने आंतरराष्ट्रीय साहित्यक्षेत्रात असे दणदणीत पदार्पण करून सर्वांनाच थक्क करून टाकले. परीकथेतल्या सिंड्रेलासारखेच. एका रात्रीत अरुंधती केरळच्या, दिल्लीच्या परिसरातून बाहेर पडून साहित्यक्षेत्रातली सम्राज्ञी होऊन बसली.

प्रत्येक भारतीय लेखकाला अरुधती रॉयच्या यशाने नवा आत्मविश्वास, नवा आत्मसन्मानाचा भाव प्रदान केला. या तिच्या अभूतपूर्व यशामुळे उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त होणे अपरिहार्यच आहे.

ही कादंबरी खरोखरच एवढी श्रेष्ठ आहे का? तिच्या 'लिटररी एजंट'ने आणि प्रकाशकांनी आधुनिक 'मार्केटिंग' तंत्राचा वापर करून या कादंबरीबद्दल हवा निर्माण करून तिचा फायदा घेतला?

आर्किटेक्ट म्हणून पदवीधर झालेल्या अरुंधती रॉयने दूरदर्शनवरील मालिकांच्या पटकथा लिहिल्या. चित्रपट निर्माता प्रदिप किशन हा तिचा पती. त्याच्या चित्रपटांसाठी कथालेखन केले. वडील बंगाली. चहाच्या मळ्यात अधिकारपदावर. आई केरळची. सीरियन ऑर्थोडॉक्स ख्रिश्चन धर्मीय. त्यामुळे प्राथमिक शिक्षण कोट्टायमजवळच्या गावात झालेले. मल्याळी भाषेत. आई-

# हे पुस्तक का वाचावे?

१) साडेतीन कोटी रुपये अगाऊ मानधन मिळवणारी भारतीय लेखिकेची पहिलीच कादंबरी.
२) अनेक महिने बेस्टसेलर यादीत समाविष्ट.
३) जगातील प्रमुख भाषांमध्ये भाषांतर व गाजावाजा.
४) मराठी अनुवादही अत्यंत सशक्त व वाचनसुलभ.
५) जगभर गाजलेली कादंबरी आपण वाचायलाच हवीय.

वडिलांनी घटस्फोट घेतल्याने दिल्लीला पुढे उच्च शिक्षणासाठी प्रयाण, तेथेच तिचे वास्तव्य...

अरुंधतीने नंतर एक कादंबरी लिहिण्याचा घाट घातला. आपल्याच जीवनातले, अनुभवातले, अनेकविध प्रसंग या कादंबरीत गुंफले.

राहेल आणि एस्थाप्पन ही जुळी भावंडे.

राहेल मुलगी. एस्था मुलगा. राहेल अठरा मिनिटांनी एस्थापेक्षा मोठी. आई अम्मा.

घटस्फोटानंतर मुलांना घेऊन आई अम्मू कोट्टायमला राहते. अम्मूचा भाऊ चॅको हा एके काळचा ऑक्सफर्डचा ऱ्होड्स स्कॉलर; पण आता घरातला 'पॅरेडाइज पिकल' चा लोणच्याचा उत्पादन-वितरणाचा धंदा पाहणारा.

आजोबा पप्पाजी हे जुन्या जमान्यातले. रुबाबदार, कडक, सनातनी, अधिकार गाजविणारे. आपल्या अपूर्ण महत्त्वाकांक्षा पुढच्या पिढीवर लादणारे.

आजोबांची धाकटी बहीण बेबी कोचम्मा. वैफल्यग्रस्त, कडवट, चॅकोचा विवाह तरुणपणी एक इंग्लिश बारमेडशी झालेला होता. आता ती शिक्षिका आहे. तिला एक मुलगी असते. साफी मोल. हा हिंदुस्थानला परतल्यावर मार्गारेट दुसरा विवाह करते; पण तिचा दुसरा नवरा मरतो. तेव्हा चॅको तिला आपल्या मुलीसह केरळमध्ये येण्याचा आग्रह करतो. आपल्या आयेमेनेमच्या प्रशस्त घरात सुटी घालवण्याचे निमंत्रण देतो.

राहेल व एस्थाप्पन नदीत बुडून मरण पावलेल्या साफी मोलच्या अंत्यविधीसाठी आयेमेनेमला येतात. सात वर्षांच्या या जुळया भावंडांच्या दृष्टीतून त्या अंत्यविधीचे कधी गंभीर तर कधी विनोदप्रचुर वर्णन वाचायला मिळते... या मुलांना घेऊन अम्मू पोलिस चौकीवर तक्रार करायला जाते. 'मी या मुलीच्या मृत्यूला जबाबदार आहे.' असे म्हणते; पण पोलिस इन्सेक्टर तिला धुडकावून लावतो. 'वेश्येची तक्रार आम्ही लिहून घेत नाही,' असे म्हणून तिला चौकीतून घालवून देतो. नंतर एस्थाप्पनला त्याचे वडील कलकत्त्याला नेतात. बोर्डिंग स्कूलमध्ये ठेवतात. राहेल ही मात्र आपल्या आईजवळ कोट्टायमला राहते.

तेवीस वर्षांनी एस्थाप्पन पुन्हा काट्टायमला येतो. त्याचे वडील तेथील नोकरी सोडून ऑस्ट्रेलियात कायम वास्तव्यासाठी जाण्याचे ठरवतात. एस्थाप्पनला बरोबर नेणे त्यांना सोयीचे वाटत नाही,,, आपल्या परागंदा व परस्थ वडिलांबद्दल या मुलांना विलक्षण ओढ वाटते. त्यांना भेटायची तळमळ असते... अम्मूचाही एकाकीपणा, स्वाभाविक उर्मी... वेलुथा या कनिष्ठ वर्गातल्या हुशार व बलदंड तरुणाचे तिला आकर्षण. त्यातून वेलुथाची झालेली भीषण हत्या इत्यादी या कादंबरीतील प्रसंगांची मालिका ही कालक्रमाने आलेली नाही. भूतकाळातील घटना, चालू घटना यांची सरमिसळ चालू राहते. रचनादृष्ट्या अत्यंत गुंतागुंतीची अशी ही कादंबरी आहे आणि तरीही ती खिळवून ठेवते. वाचत राहावीशी वाटते.

अरुंधती रॉय इंग्लिश भाषा अत्यंत सहजपणे लिहिते. व्याकरणाचे नियम ती धुडकावून लावते. उपपदे, कॅपिटल व स्मॉल लेटर्स, विशेषणे- क्रियाविशेषणे यांची हवी तशी तोडमोड करते. नवी क्रियापदे वापरते, नवे शब्द बनवते. आपण इंग्लिशमध्ये काही लिहितो. व्याकरणदृष्ट्या वाक्य बरोबर आहे की नाही, कर्ता-कर्म-क्रियापद यांचा मेळ बसतो की नाही, कॅपिटल अक्षर कुठे हवे, स्पेलिंगमध्ये तर चूक नाही ना- अशी अपराधी भावना मनात ठेवून फार चिंता करतो. परंतु अरुंधती रॉय इंग्रजी भाषेची, शब्दांची हवी तशी मोडतोड करते. एखादे रबराचे खेळणे हाताळावे तसे इंग्रजी शब्दांना इकडेतिकडे घुमवते. भाषेच्या या लकबींमुळे तिने केलेली वर्णनेही चित्रदर्शी होतात. आणि ही मोडमोड करताना तिला कुठेही अडखळल्यासारखे वाटत नाही. केरळीय इंग्लिश लिहिताना तिला कुठेही संकोच जाणवत नाही. ती उपमा, अलंकार वगैरेही वाटेल तसे वापरते.

It was raining when Rahel came back to Ayemenem. Slanting silver ropes slammed into loose earth, ploughing it up like gunfire. The old house on the hill wore its steep, babled roof pulled over its ears like a low hat. The walls, streaked with moss, had grown soft, and bulged a little with dampness that seeped up from the ground... Hopeful yellow bullfrogs cruised the scummy pond for mates. A drenched mongoose flashed across the leaf-strewn driveway.

असे पावसाळ्याचे वर्णन करताना अरुंधती तेथली वनस्पती, प्राणी, जमीन सर्वांची दखल घेते.

Not old
Not young
But a viable die-able age

अशासारखे खेळ ती लीलया करते.

फ्रुटी एअर, फॅटली बॅफल्ड, इममॉडेस्ट ग्रीन अशी मजेदार विशेषणे ती वापरते. फरीव्हरिंग, सॉरी फ्लॅपिंग, डलथडिंग अशासारखे शब्द एकत्र आणून त्या वर्णनांना नेमकेपणा आणते; पण

त्याबरोबर काहीसे चक्रावूनही सोडते. काळ व स्थळ यांना ही कथावस्तू भेदून जाते.

बुकर प्राइझची घोषणा करताना परीक्षकांच्या वतीने कलेल्या निवेदनात खिळवून ठेवणारी निवेदनशैली (स्पेलबाइंडिंग नॅरेशन) दक्षिण भारताचा इतिहास व परंपरा यांचे सात वर्षे वयाच्या जुळ्या भावंडांच्या परिप्रेक्ष्यातून घडवण्यात आलेले दर्शन, त्या परंपरेतील खोटेपणा व कायदेशीरपणा वगैरेंचा उल्लेख केला गेला आहे.

अनेक नामवंत समीक्षकांनी कादंबरीचा मुक्तकंठाने गौरव केला आहे. वेगवेगळी वैशिष्ट्ये टिपली आहेत. निवेदनशैलीचे तंत्र हे आधुनिकवाद, जादुई वास्तववाद, सिनेमॅटिक, मॉँटाज या सर्वांना सामावून घेऊन पुढे जाते असे एक समीक्षकाने म्हटले आहे.

नंबुद्रीपाद, कम्युनिस्ट पक्षाचे राजकारण यांचे चित्रण वास्तवापेक्षा वेगळे आहे, असा आक्षेप मार्क्सवादी विचारवंतांनी घेतला आहे. अश्लीलतेवरून पुस्तकावर खटलाही झाला आहे; परंतु ही मतमतांतरे असली तरी कादंबरी जगभर पोचली आहेच.

'दि गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज'चे हे यश म्हणजे गुणवत्ता च लोकप्रियता या दोहोंचा सुरेख संगम आहे. आधुनिक 'मार्केटिंग'चेही ते यश आहे.


पंकज मिश्रा या हार्पर कॉलिन्स प्रकाशनसंस्थेतील संपादकाने हे हस्तलिखित वाचले. विक्रम सेठ वगैरे लेखकांचा लिटररी एजंट डेव्हिड गॉडविन याच्याकडे ते लंडनला पाठवले. गुरुवारी त्याला ते मिळाले. रविवारी तो सरळ विमानाने दिल्लीला आला. इतका तो या पुस्तकाने भारावून गेला होता. या कादंबरीमुळे तुला दिगंत कीर्ती मिळेल, असे त्याने अरुंधतीला सांगितले. इंग्लंड-अमेरिकेतल्या प्रकाशकांशी संपर्क साधला. हार्पर कॉलिन्सने दहा लाख डॉलर आगाऊ रॉयल्टी देण्याचे मान्य केले. इतर भाषांतील अनुवादक व प्रकाशक यांच्याशी संपर्क साधला. भारतातील हक्क इंडिया इंकच्या तरुण तेजपाल यांजकडे दिले. डेव्हिड गॉडविनसारख्या रत्नपारखी लिटररी एजंटकडे हे हस्तलिखित गेले. त्यामुळे त्याचे सोने झाले.

भारतीय लेखक-प्रकाशकांनीही यापासून काही घडा घ्यायला हवा. विक्रम सेठ, सलमान रश्दी, अमिताव घोष, उपमन्यू चॅटर्जी, भारती मुखर्जी, अनिता देसाई वगैरे भारतीय लेखक आज इंग्लंड-अमेरिकेत गाजत आहेत. परदेशी लेखकांच्या तुलनेत आपण कमी पडत नाही. आत्मविश्वासाने लेखन करायला हवे. आपल्याजवळ सांगण्यासारखे खूप काही आहे. आजवर आपण पाश्चात्य पुस्तकांच्या लेखकांचे आदर्श समोर ठेवून लिहिण्यात मश्गुल होतो. आता आपला आदर्श परदेशातील लेखकांना ठेवण्याचीही कदाचित इच्छा होईल.

''अरुंधती रॉयने केरळीय साहित्याचे दालनच आंतरराष्ट्रीय वाचकांपुढे खुले केले आहे. पूर्वी आम्ही युरोपियन आणि लॅटिन अमेरिकन साहित्य केरळमध्ये आयात करीत होतो. त्यांचे अनुकरण करीत होतो. आता आमची संस्कृती, आमचे विचार, आमची वाङ्मयीन दृष्टी ही जागतिक वाचकवर्गावर प्रभाव गाजवू लागेल. म्हणून केरळच्या भाग्याच्या दृष्टीने हा मोठा महत्त्वपूर्ण क्षण आहे.'' असे मल्याळी साहित्यिक मोहन वर्मा यांनी म्हटले आहे. इतर भाषकांनाही आपल्या इच्छेने प्रतिनिधित्व करणारे हे विधान वाटायला हरकत नाही. अरुंधती रॉयचे यश तमाम भारतीय लेखकांना नवा आत्मविश्वास देऊ शकेल. नवी अस्मिता देऊ शकेल.

**किंमत : ३००रु. सभासदांना : २२५रु. पोस्टेज :२५रु.**






# शुक्रचांदणी

## ठसठशीत नायिका आणि त्यांच्या जीवनातील मूल्यसंघर्ष चितारणाऱ्या चित्तरकथा

लेखिका : **माधवी देसाई**

माधवी देसाई यांच्या अकरा कथांचा समावेश 'शुक्रचांदणी'या पुस्तकात करण्यात आला आहे. हा त्यांचा सहावा कथासंग्रह. ठसठशीत नायिकांच्या व्यक्तिरेखा हे कथांचे वैशिष्ट्य.

'अधांतर' या कथेची नायिका आहे एक महिला पोलिस इन्स्पेक्टर. नीलांबरी.

अजिंठ्याच्या पायथ्याशी असलेल्या एका खेड्यातील हवालदार रावराणे यांची एकुलती एक कन्या नीलांबरी. वडिलांप्रमाणेच थोराड, धिप्पाड, काळीसावळी. ती बी.ए. झाल्यावर पोलिस इन्स्पेक्टर होण्याचे ठरवते. प्रशिक्षण काळात खाकी युनिफॉर्म आणि इतरांवर अधिकार गाजवण्याची ईर्षा यांचा संचार जणू तिच्या अंगात होतो. डिस्टिंक्शन घेऊन ती ग्रुपमध्ये पहिली येते. हवालदार बापाला अस्मान ठेंगणे होते. ठाणे जिल्ह्यातील एका महिला पोलिस स्टेशनवर तिची नेमणूक होते. हाताखालच्या अधिकाऱ्यांवर जरब बसवते. गुन्हेगारांना ती कर्दनकाळ वाटते. त्यांना लाथाबुक्क्यांनी तुडवून काढायचे काम मात्र ती असिस्टंटवर सोपवते. लग्नाचा बेत ती लांबणीवर टाकत राहते. तिचे वडील घोकत राहतात.''लेकीचं लगीन? चिल्लर गोष्ट. आधी डी.वाय.एस.पी. तर होऊ द्या.'' आई सुमन मात्र तिला सांगत राहते,''लग्न करून टाक पोरी. हे असं राहणं खरं नव्हे.'' एकदा चोरीच्या आरोपावरून एका आदिवासी कुटुंबातील चौघांना पकडून आणले जाते. ''माय, पोरं घरी उपाशी. जन्मात कधी चोरी केली न्हाय. तू बाईमाणूस दया कर. सोडून दे. ही लछमी पोटुशी हाय. बायामान्स आम्ही.'' त्या आदिवासीपैकी म्हातारी गयावया करीत होती. पण नीलांबरीचा पोलिसी खाक्या. ''बायामाणसं? एवढं का कौतुक ह्या बाईपणाचं? कुणासाठी? चोरा करताना कुठे गेलं होतं बाईपण? घरी पोरं आहेत? आणि ही पोटुशी. हाच खरा उपयोग बाईपणाचा? की आणखीही काही?'' असं म्हणत ती कातडी पट्ट्याचे वार त्या दोन बायांवर सपासप करत राहते. म्हातारी खाली कोसळते. सुनेची साडी रक्तानं माखते. नीलांबरीचे असिस्टंट सांगतात,''मॅडम, आवरा स्वत:ला हे महिला पोलिस ठाणे आहे... आदिवासी... काही झालं तर पेपरवाले आणि सोशल वर्कर तुटून पडतील.'' त्या दोघींना हॉस्पिटलमध्ये नेण्याची गरज असते. पण अंगावर वळ. कायद्याने गुन्हा . लछमी दम सोडते.

...पहाटे पहाटेच तिच्या बरोबरच कोर्सला असणारा आणि जवळच्याच पोलिस ठाण्यावर

## हे पुस्तक का वाचावे?

१) जगावेगळे अनुभव व आयुष्य जगणाऱ्या पण मोठ्या मनाच्या नायिका.
२) पोलिस इन्स्पेक्टर, गायिका, खानदानी पुत्रवधू- यांच्या जीवनातील कसोटीचे प्रसंग.
३) शरीर आणि मन यांच्यातील रस्सीखेच.
४) आपल्या मनात काहीही असो, नियतीच्या मनात असेल तेच खरे!
५) मेलोड्रॅमॅटिक कथावस्तूंची आकर्षक उभारणी.

इन्स्पेक्टर असलेला जगताप आपल्या पत्नीबरोबर येतो आणि सांगतो,''मॅडम, लछमी, तिची सासू आमच्याच बंगल्याच्या आऊटहाऊसमध्ये राहतात. गरीब माणसं. चोरी करणंच शक्य नाही. त्यांना जामीनावर सोडा...''

-आणि नीलांबरी म्हणते.''लछमी? शी इज नो मोअर. मी मारलं तिला. नाऊ मिस्टर जगताप, ॲरेस्ट मी.''

अशी नाट्यपूर्ण तरीही भावस्पर्शी कथानकाची गुंफण करण्यात कथाकार माधवी देसाई तरबेज आहेत. हवालदार महत्त्वाकांक्षी बाप, त्याची तशीच अधिकार गाजविणारी लाडकी लेक, पोलिसी खाक्याचा अभिमान, अहंकार, स्त्री म्हणून सहकाऱ्याने डिवचणे, त्याचा राग गरीब आदिवासी स्त्रीवर काढणे, मारहाणीनं त्या स्त्रीचा मृत्यू घडणे. त्या प्रेताची विल्हेवाट लावण्याची असिस्टंटची सूचना धुडकावून लावणे, आणि ते आदिवासी कुटुंब नेमके त्या परिचीत सहकारी पोलिय इन्स्पेक्टरच्या आऊटहाऊसमध्ये राहणारे निघणे आणि त्यानेच जामीनासाठी नीलांबरीकडे येणे -असे सगळे आदर्शवादी धागेदोरे गुंफत आपल्या मेलोड्रामिक कथावस्तूची रंगत वाढवत नेणे ही माधवी देसाई यांची हातोटी वाचकांच्या परिचयाची आहे.

घराण्याचा अभिमान आणि कलावंताचे उत्तरदायित्व यांच्यातील संघर्ष 'शुक्रचांदणी' या कथेत दिसतो. राजगढचे राजगायक रहेमखां आपल्या तिन्ही मुलांना गायनवादनाचे धडे देतात. त्यातल्या अमिनकडे ते भावी राजगायक म्हणून बघत असतात. अठरा वर्षांच्या प्रदीर्घ तपश्चेनंतर रहेमखां या मुलाला सांगतात,''बेटा, माझ्या गुरूनं मला दिलेला संगीताचा खजिना तुझ्या हाती देऊन आज मी गुरु ऋणातून मुक्त झालोय. ही उत्तरेच्या संगीताची कावड तू दक्षिणेत पसरू दे. या घराण्याचा वारसा टिकवेल असा एखादा शागीर्द तयार कर.'' अमिनखां मुंबईत येऊन संगीतक्षेत्रात आपले बस्तान बसवण्यासाठी खूप परिश्रम घेतात. शिकवण्या घेतात. छोट्यामोठ्या बैठकी करतात. त्यांची कन्या गुलबदन जेव्हा त्यांच्याच गायकीची झलक दाखवते तेव्हा मात्र ते संतापतात,''खबरदार, पुन्हा तानपुऱ्याला हात लावशील तर...तानपुरा खांद्यावर ठेवून गायला तू कोणा कोठीवालीची मुलगी नाहीस. या घरच्या मुलींनी असं गाताना कुणी ऐकलंय? तो रिवाज



नाही या घरचा'' ते तिचं लग्न आपला आवडता शिष्य दिलावर याच्याशी लावून देतात... काही वर्षे जातात. दिलावर कात्यायनीच्या कोठीवर दिवसेंदिवस राहू लागतो; गुलबदनशी प्रतारणा, गुरूशी प्रतारणा, गाण्याशी प्रतारणा -अमिनखां संतप्त होतात. आपल्या घराण्याच्या गायकीचा वारस कोण या प्रश्नाने अस्वस्थ होतात; आणि एक दिवस कन्या गुलबदनला म्हणतात, ''ये बेटी बैस, तो तानपुरा घेऊन षड्ज लाव... जातोय कुठे दिलावर? दिवसभर भटकलेला राही रात्री घरी येतोच ना? तसं दिलावरला यावं लागेल. तुझे सूर त्याला खेचून आणतील.''

लग्नाला वर्ष होऊनही सगुणाला तिचा नवरा विश्वास देशमुख अस्पर्शितच ठेवतो हे कळल्यावर सगुणाची मैत्रीण आसमा अस्वस्थ होते. सगुणा हे कोणालाही कळू देत नाही; कारण आपल्या नवऱ्याचे दु:ख तिला ठाऊक असते. त्याची एकेकाळची प्रेयसी स्वप्ना हिच्यावर गुंड बलात्कार करतात; पुराव्याअभावी गुंड निर्दोषी म्हणुन सुटतात, स्वप्नाचे लग्न मोडते.

...या कथेला लेखिका नंतर वेगळीच कलाटणी देतात. एकदा स्वप्ना कर्तव्यभावनेने रक्तदान करायला येते तेव्हा डॉक्टर तिच्या रक्ताची तपासणी करतात आणि तुमचं रक्त चालणार नाही म्हणतात. कारण रक्तात एच.आय.व्ही. पॉझिटिव्हची लक्षणे दिसतात. जगावर सूड उगवायचा म्हणून ती विश्वासला जवळ करते. त्याच्याबरोबर फार्महाऊसवर दोन महिने राहते... आणि विश्वासची तब्येत झपाट्याने बिघडत जाते. तपासणीत कळते की तोही एच.आय.व्ही. पॉझिटिव्ह आहे.

सगुणा त्याची सेवाशुश्रुषा करते... पण दुसरीकडे देवाला धन्यवाद देते. कारण विश्वासने तिला स्पर्शही केलेला नसतो. आसमा म्हणते,''विश्वास दुबळा होता; आणि स्वप्ना नियतीची शिकार. तसं तर तूही नियतीचाच बळी. तू धीरानं वाटचाल केलीस... दया, क्षमा, शांती, धैर्याची पुतळी... या जगात तुझ्यासारखी माणसं आहेत म्हणून तर हे जग सुंदर आहे.'' आसमा तिला नंतर म्हणते,''या घराशी तुझा असलेला ऋणानुबंध संपला. तू आता माझ्याकडे राहा. शिक्षण पूर्ण कर... विश्वासानं जग. खचू नकोस. जे घडेल ते चांगलेच असणार यावर विश्वास ठेव.''

'सगुणा'ची ही कथा नियतीच्या वादळवाऱ्यातही आसमाच्या दमदार मैत्रीच्या रूपात तिच्यातील आशावाद अभंग ठेवते.

खानदानी कुळातील राजाक्का ही सुरजित हा वयस्क नवरा आपल्या नशिबी आला म्हणून नाराज असते. याच्यापासून आपल्याला मूल होता कामा नये असे ठरवते. तिला आवडलेला कुलदीप या तरुणाचे लग्न दुसऱ्याच कोणा मुलीशी झालेलं होतं. त्याचा राग तिच्या मनात होता. तरीही वीस वर्षं सुरजितचा संसार ती सजवते. सुरजितचे अचानक देहावसान होते; तेव्हा गुणाक्काचा विशीतला मुलगा चंद्रहास तिला माहेरी न्यायला येतो. गुणाक्का त्याला जन्म देताच मेलेली असते, त्याचे वडीलही जातात. आजीने त्याला वाढविलेले असते. चंद्राहासला बघितल्यावर राजाक्काला आपल्या जगण्याचे प्रयोजन सापडते. ती माहेरी येते. माहेरचा ताबा घेते. घरातले मासाहेबांचे साम्राज्य आपल्या हाती घेते. सारेजण तिला अघोरी म्हणतात. राजाक्काच्या अशा वागण्याने मासाहेबांचा मृत्यू होतो. चंद्रहासचे एका मुलीवर प्रेम जडते. तो तिची आपल्या मावशीशी ओळख करून देतो. आता चंद्रहास आपल्याला दुरावणार या भावनेनं राजाक्काचं मन, शरीर अतिशय अस्वस्थ होते. त्या धक्क्यानंच तिला मृत्यू येतो. आपल्या मावशीच्या अस्थिविसर्जनासाठी चंद्रहास नाशिकला जातो. बोटीतून प्रवाहाच्या मध्यभागी जाऊन अस्थींचा कलश सोडण्यासाठी वाकतो; आणि नदीत पडतो. गटांगळ्या खाऊ लागतो. 'शेवटी अघोरीनं डाव साधला' असे रघुभटजी म्हणतो... अशा 'अघोरी'सारख्या कथेतही लेखिका अनेक कथासूत्रांची गुंफण करून

कथेतली गुंतागुंत वाढवत जातात. अपघात योगायोग यांची रेलचेल त्यांच्या कथानकांची गाडी त्यांना अनपेक्षित त्या दिशेने वळवणे सुलभ करते. राजाक्काची आयुष्यभराची अतृप्ती. तिला अंतच नाही. त्याच्या उतारवयात त्यांना तृप्तीचे केवळ क्षणिक दर्शन होते. पण ती केवळ हुलकावणी ठरते.

''या शरीराच्या आत एक मनं असतं. त्या मनाला बरंच काही हवं असतं. चांगलं आणि वाईटही.'' हे नेल्सीचे शब्द गोव्याहून परतताना इन्स्पेक्टर चंद्रहासच्या जीवनाला झोके देत राहतात. साठीतली नेल्सी डान्टस् पन्नाशीतल्या चंद्रहासला आपल्या थॉमसबरोबरच्या सुखी सहजीवनाची कहाणी सांगते आणि त्याला म्हणते, ''चंद्रासाब, मला सोबतीची, मैत्रीची खूप गरज आहे. आता या साठ वर्षांच्या शरीराला काहीच नको आहे. पण शरीराच्या आत जे मन असतं ना त्याला खूप काही हवं असतं... त्यासाठी एक चांगली मैत्री हवी. चांगला सहवास हवा. द्याल तुम्ही तशी मैत्री! सर, बंगलीत याल राहायला?'' अरुंधतीच्या रूपात स्त्री जीवनाची कलंकित बाजू बघितलेल्या चंद्रहासला ही लखलखीत चांदणी जीवनाचे एक नवेच दर्शन घडवते; पण त्यामुळेच या कॅथॉलिक श्रीमंत भाटकरणीच्या त्या विनवणीला प्रतिसाद देणे जड वाटते. 'उंच गेलेला झोका कधीच उंचीवर टिकत नाही... उंचीवर गेल्यावर क्षणभर दिसलेलं दृश्य मनात साठवून खाली जमिनीवर उतरायचं असतं' असा विचार त्याच्या मनात घोळत राहतो.

'अनमोल हिरा' ही कथा अंजनी, सुरंगा, हिरा या तीन मैत्रिणींच्या जीवनकथांची गुंफण करणारी कहाणी . वयस्कर हिराला नेनेसारखा निस्सीम प्रेम करणारा माणूस लाभला, तर अज्ञातवासात एखाद्या निसर्गरम्य ठिकाणी राहण्यातही सुख लाभू नये असे म्हणून अंजनी सुरंगाची समजूत काढते आणि हिराला निरोप देताना सांगते.''जा हिरा विश्वासानं जा. तू ज्याचा शोध घेत होतीस ते तुला शोधतं आलं शेवटी.''

आपल्यावर प्रेम करणारा पुरुष लाभला -एवढचं तिला हिराच्या सुखाचं कारण वाटत नाही. तर निसर्ग, एकान्त अज्ञातवास हाही माणसाला अंतर्मुख करतो; आपल्याला काय हवं नको याचं भानं त्यामुळं येतं. स्नेह हाही आश्वासक असतो -असे अंजनीला वाटते. अनमोल हिराला नेने हे अचूक कोदण ठरेल असे ती मानते.

माधवी देसाई यांची जीवनाकडे, स्त्री-पुरुष सहवासाकडे, नातेसंबंधांकडे, जगाकडे पाहण्याची दृष्टी आदर्शवादी आहे तशीच समंजसपणाची आहे. नियती या जीवनात खूप घोळ घालते, वादळे उठवते. पण मानवी मनाचा चांगुलपणा, भलेपणा त्या नियतीच्या भल्याबुऱ्या आघातांनीही पूर्णतया निष्प्रभ कधी होत नाही; तो टिकूनच राहतो. आपल्या आणि इतरांच्या दु:खवेदनांवर तो फुंकर घालतो. काळ हा देखील ही फुंकर घालण्यात पटाईत असतो. तरीही नियतीचे काही हिशेब असतातच. एकेकाचे भवितव्य घडवताना नियती त्या हिशेबाप्रमाणे खूप काही घडवून जमा-खर्चाच्या बाजूंची तोंड मिळवणी साधन असते. समानधर्म्यांना जवळ आणत असते; आयुष्यात नवा आशय व अर्थ भरत असते. वेगवेगळे प्रश्न -कथावस्तूच्या पार्श्वभूमीसाठी निवडण्यातही माधवी देसाई यांची विविधतेची हौस जाणवते. भरपूर तपशील असणाऱ्या मेलोड्रॅमॅटिक परंपरेतल्या नाट्यपूर्ण घटनाप्रचुर कथांचा बाज त्यांना प्रिय आहे. बहुसंख्य वाचकांनाही त्यामुळे माधवी देसाई यांच्या कथा आकृष्ट करतात. अल्पावधीत निघालेले सहा संग्रह हे त्याचीच तर साक्ष पटवतात.

**किंमत : १००रु. सवलतीत : ८०रु.**

**सभासदांना : ७५ रु. पोस्टेज :२०रु.**



# डिफिकल्ट डॉटर्स

## आदर्श मुली घडवण्याचा घरोघर चाललेला उद्योग आणि आपली अस्मिता प्रकट करण्याचा मुलींचा जन्मसिद्ध बाणा

मूळ लेखिका : **मंजू कपूर**

अनुवाद : **रेणू गावस्कर**

मंजू कपूर यांची'डिफिकल्ट डॉटर्स' ही कादंबरी तीन वर्षांपूर्वी इंग्रजीत प्रसिद्ध झाली.

तिचा मराठी अनुवाद रेणू गावस्कर यांनी केला असून तो मेहता पब्लिशिंग हाऊसने नुकताच प्रसिद्ध केला आहे.

फाळणीच्या बऱ्याच आधीच्या काळाचे अमृतसर, डलहौसी, लाहोर, दिल्लीचे वातावरण या कादंबरीत आले आहे. त्यावेळी सहा पैशांत पायजमा शिवून मिळायचा, शर्टाच्या शिलाईला दोन आणे लागायचे. एक रुपयाला एक शेर तूप मिळायचे. बारा शेर आट्याला एक रुपया पडायचा, सोनं तीसचाळीस रुपये तोळा मिळायचं; अमृतसर-लाहोर प्रवासाला आठ आणे लागायचे.

अमृतसरला जवाहिऱ्याचा मोठा व्यापार करणाऱ्या लाला दिवाणचंदांच्या पेढीचा तरुण वारसदार व कांगडी गुरुकुलाचा स्नातक सूरजप्रकाश याची आपल्या भावी वधूसंबंधी वृत्तपत्रात जाहिरात येते. ती जाहिरात वाचून सुलतानपूरचे सुक्यामेव्याचे व्यापारी आर्यसमाजिस्ट लाला जीवनदास आपली विशीतली मुलगी कस्तुरी हिला पाहण्यासाठी सूरजप्रकाशना आमंत्रण देतात. कस्तुरीच्या काकांनी मुलींसाठी शाळा काढून, हिंदू स्त्रीचं सुंदर प्रतीक कस्तुरीच्या रूपानं समाजापुढं उभं करण्याचा चंग बांधला. तिच्या शिक्षणात अडथळा नको म्हणून तिच्यासाठी येणारी स्थळं नाकारली. आर्यसमाजाचे हवन, ध्यानधारणा, संध्या यांच्या संस्काराबरोबर अभ्यासाप्रमाणेच शिवणकामातही तिने प्रावीण्य मिळवले. शालेय शिक्षण संपल्यावर घरकामाचे धडे तिला देण्यात आले. स्वयंपाकातही ती तरबेज झाली. पुस्तकांचंही तिला वेड होतं. सूरजप्रकाश आणि कस्तुरी यांचा विवाह थाटात होतो. एकोणिसशे वीसच्या सुमाराला.

या दांपत्याला त्या काळच्या पद्धतीप्रमाणे थोडी थोडकी नव्हे तर तब्बल अकरा मुले होतात. वीरमती ही सर्वात मोठी कन्या. नंतर इंदुमती, गुणवती, हेमवती, विद्यावती आणि पार्वती. कैलाशनाथ, कृष्णनाथ, प्रकाशनाथ आणि हिरानाथ... वर्षा-दोन वर्षाआड होणाऱ्या बाळंतपणांनी कस्तुरीची तब्येत कायमच त्रास देत असायची, त्यामुळे सर्वात मोठी मुलगी म्हणून कळायला लागल्यापासून वीरमतीलाच घरातली सर्व कामं करावी लागत; आणि भावंडांची ही

| | | |
|---|---|---|
| **हे पुस्तक का वाचावे?** | १) | **फाळणीच्या पूर्वीचे अमृतसर-लाहोर येथील आर्यसमाजिष्ट सनातनी श्रीमंत घराण्याची पार्श्वभूमी.** |
| | २) | **विवाहित प्राध्यापकाच्या प्रेमात पाडलेल्या वीरमतीची मानसिक ओढताण.** |
| | ३) | **आईवडिलांचा राग संताप आणि त्यामुळे आलेले दुरावा.** |
| | ४) | **फाळणीपूर्व दंगलीत कुटुंबांची होणारी दिलजमाई.** |
| | ५) | **घराण्याची परंपरा आणि स्वत:ची स्वतंत्र धारणा, मायलेकींच्या नात्याचा संघर्षपूर्ण पट.** |

काळजी घ्यावी लागे. जणू त्या भावंडांची दुसरी आईच झालेली होती. दहाव्या वर्षापासूनच तिला आईच्या गर्भारपणाच्या चक्राच्या जुळवून घेणं भाग पडलं. तिची काकी लाजवंती ही त्याच प्लॉटमधल्या दुसऱ्या टोकाकडच्या घरात राहत असे; ती मुलांच्या लेंढाराबद्दल नेहमी कस्तुरीला टोमणे मारत असे. तिला दोनच मुले होती. वीरमती सोळा वर्षांची झाली तेव्हा तिची आई अकराव्या खेपेला गरोदर होती. गर्भ पाडायचे प्रयत्न अपयशी ठरले आणि झालेली मुलगी अगदीच अशक्त निघाली. तिला अंगावर पाजणेही कस्तुरीला शक्य झाले नाही...

डॉक्टरांच्या सल्ल्यामुळे कस्तुरीला विश्रांतीसाठी डलहौसीला पाठवण्याचे ठरले. त्यावेळी वीरमतीचे वय सतरा वर्षे होते आणि फर्स्ट इयर आर्टसचा तिचा अभ्यास चालू होता. आईची देखभाल करण्यासाठी तिलाही डलहौसीला पाठवण्याचे ठरले. आता वर्षा-दोन वर्षात तिचे लग्न होणार -तेव्हा अभ्यास थोडा बुडला तर कोणालाच त्याची पर्वा नव्हती.

डलहौसीचे भाड्याचे घर बघून लाजवंतीलाही तिथे काही काळ काढण्याची संधी सोडवत नाही. लाजवंतीची मुलगी शकुंतला ही कॉलेजमध्ये केमिस्ट्रीची लेक्चरर असते. लग्नाची टाळाटाळ करीत असते. वीरमतीला आपल्या या चुलतबहिणीचा एकुणच मडमेचा अवतार आवडतो. शकुंतला सांगते, ''माझ्या सगळ्या मैत्रिणी वेगवेगळ्या घरांतून आलेल्या आहेत; पण प्रत्येकीच्या घरचे लोक आम्ही लग्न करून स्थिरावत नाही म्हणून नाराज आहेत. आम्ही खूप प्रवास करातो, करमणुकीच्या कार्यक्रमांना जातो, पेपर वाचतो, सेमिनार्सना हजर राहतो...'' शकुंतलाचे धूम्रपान, घोड्यवरून फेरफटका, बॅडमिंटनमधले कौशल्य -वीरमतीलाही थक्क करते. लाहोरमध्ये तिचे एकटीचे राहणे -तिचे आर्थिक स्वातंत्र्य- वीरमतीलाही त्याचे आकर्षण वाटते. ''एक दिवस मीही लाहोरला येईन. मलाही खूप काही करायचं आहे.'' असं ती म्हणते. तिच्या आकांक्षेला खतपाणी मिळते.

-अमृतसरला परतल्यावर वीरमतीची फाइन आर्टसच्या परीक्षेची तयारी चालू होते. पण



भावंडांची काळजी घेण्यात अभ्यासाला वेळच मिळत नाही. ती नापास होते. शाळा संपली की लग्न करावे लागेल; अनेक स्थळेही येतात. अमृतसरच्या लंपेल ग्रिफिन रोडवरच्या प्रशस्त घरात स्थलांतर होते; तेव्हा लाजवंतीही स्वत:चे वेगळे घर त्याच आवारात बांधून घेते.

ऑक्सफर्डमधून अमृतसरच्या एका कॉलेजमध्ये प्रोफेसर म्हणून आलेल्या हरीशचंद्र यांना लाजवंती भाडेकरू म्हणून जागा देते. प्रोफेसर हरीश यांनी आपल्या पत्नीला हिंदी-इंग्रजी शिकवण्याचा प्रयत्न केला पण पत्नीची फारशी प्रगती झाली नाही. वीरमती प्रा. हरीश यांच्या शिकवण्यावर खूष होते. आणि प्रा. हरीशही तिच्या प्रेमात पडतात. आपण तिच्याशिवाय जगू शकणार नाही असं ते तिला सांगतात...

अर्थात् अशा प्रेमाला गुप्तता पाळावीच लागते, आणि घरीदारी त्याबद्दल बोलणे अवघडच असते.

वीरमती आलेली चांगली चांगली स्थळे नाकारत जाते; तेव्हा सारेच वैतागतात. शकुंतलाच्या कॉलेजात तिने नाव दाखल करावे, वसतिगृहात राहावे आणि बी.ए. व्हावे, शाळेत नोकरी करावी असं ठरते. वीरमती त्याप्रमाणे लाहोरला जाते. प्रा. हरीशही तिला तेथे अधूनमधून भेटतात. एका दुसऱ्या प्राध्यापकाच्या घरी चोरूनछपून भेटीगाठी होत राहतात...

तेवीस वर्षांच्या वीरमतीला एका संस्थानमधल्या प्रतिभा कन्या विद्यालयात मुख्याध्यापक म्हणून नेमण्यात येते. तेथे एक दिवस प्रा. हरीश येतात. रात्रभर राहतात. तेव्हा टर्म संपल्यावर तिला डच्चू मिळतो. नंतर तिला कळते की आपली पाळी चुकलीय. ती प्रा. हरीशला गाठायचा प्रयत्न करते. अमृतसरला घरी जाणे अडचणीचे वाटते, शांतिनिकेतनला जायचे असे ती जाहीर करते. दिल्लीला आल्यावर कलकत्ता ट्रेनला वेळ असल्याने प्रा.हरीशच्या कविमित्रोडे जाते. तो तिची अवस्था बघून हरीशला तारेने बोलावून घेतो. हरीश येतो. कविमित्र त्याला सांगतो, ''तू आत्ताच्या आता तिच्याशी लग्न केलं पाहिजेस. नाहीतर तू तिला कायमची गमावून बसशील... तू लग्न कर. सर्वात सोपा मार्ग तोच आहे... प्रत्येकाच्या आयुष्यात एक कृतीची म्हणून वेळ येते. तुझ्याबाबतीत ती वेळ आली आहे.''

''माझी बायको, मुलं-''

''ते आता काय करतील? तू जर हे लग्न केले नाहीस, तर तू तिला कधीच बघू शकणार नाहीस.''

-आणि कवीचे आईवडील कन्यादान करतात. सात फेरे होतात.

पाच वर्षातले मनावरचे दडपण दूर झाल्याची जाणीव वीरमतीला होते.

दिल्लीत अचानक लग्न झालं तर खरं; पण नव्या पत्नीला घेऊन आपल्या पहिल्या पत्नीला आणि आईस सामोरं जाणं हा खरर कसोटीचा व अवघड प्रसंग. प्रा.हरीश त्या दिव्याला सामोरा जातो. ''देवानं मला अशी शिक्षा का द्यावी? माझी काय चूक झाली?'' हा प्रथम पत्नी गंगा हिचा सवाल. त्याचं उत्तर हरीशची आई देते, ''चूक कोणाची हे कोण सांगणार? तुझ्या, तिच्या, त्याच्या, माझ्या मागल्या जन्मातली ही कर्म आहेत. आपल्याला वाट्याला जे येईल ते स्वीकारावंच लागलं.. आपल्या आयुष्यात जे घडलं ते भल्यासाठीच असतं. फक्त त्या क्षणी ते आपल्याला कळत नाही.'' (पृष्ठ २२२) आईने या नव्या लग्नाचा स्वीकार केल्याने हरीशचा जीव भांड्यात पडतो. गंगाला मात्र या नव्या 'चेटकिणी'बद्दल मनोमन राग असतो. वीरमतीला ती स्वयंपाकघ्रात शिरू देत नाही. एकदा वीरमती काही करू पाहते तर स्वयंपाकघर विटाळले म्हणून प्रत्येक भांडे ती घासून घेते. ''शैय्या वीरमतीच्या ताब्यात पण स्वयंपाकघर गंगाचे'' हा संदेश ती

सर्वांच्या मनावर बिंबवते. नवराही वीरमतीला म्हणतो,'तू कशाला स्वत:ला स्वयंपाकघरात अडकवून घेतेस? तू वाचत बस. मैत्रिणीकडे जा. वाटलं तर तुझ्या घरी जा... इथं रुळायला काही काळ लागणारच.'' (२२२-२७) आपल्या आईला भेटायला वीरमती जाते तर ती म्हणते,''आता कशाला आलीस इथं? आमच्या तोंडाला एवढं काळं फासलसं... तू आमचा सर्वनाश केलास. सर्वांना लाज आणलीस...''आईच्या या वाक्ताडनानं वीरमतीला अगदी हरवल्यासारखे वाटतं. वेळ घालवण्यासाठी वीरमती एका प्राथमिक शाळेत शिकवू लागते.

ते दिवस दुसऱ्या महायुद्धाचे, रेशनिंग, दंगली, गोळीबार तशात वीरमतीचे वडील सूरजप्रकाश विषारीवायुमुळे दुकानातच कोसळतात. अंत्यसंस्काराच्या वेळी प्रा. हरीश येतात. वीरमतीला तिची आई म्हणते,''तू इथं का आलीस? तुझ्यामुळं ते गेले. नाहीतर त्यांचं काय वय होतं जायचं?'' दुसऱ्या दिवशी सूरजप्रकाशच्या मृत्यूच्या धक्क्याने लाला दिवाणचंद हेही निधन पावतात. ''वडील क्षमा न करताच गेले, आजोबांच्या बाबतीतही तेच झालं.'' या विचाराने वीरमती त्यांच्या अंत्यसंस्काराला जाण्याचे टाळते. सर्वात मोठा जावई म्हणून प्रा. हरीश मात्र तेथे जाऊन आपले कर्तव्य पार पाडल्याचे समाधान मिळवतात...

वीरमती गरोदर राहते. पण अकाली गर्भपात होतो. वडिल, आजोबा आणि अपत्य तिच्या उदासीनतेला अंत राहत नाही. लग्नाला वर्ष झाल्यावर प्रा. हरीश तिला सुचवतात, ''तू लाहोरला राहून एम.ए. कर. तत्त्वज्ञान विषय घेऊन एम.ए.कर...'' गंगाला आपलं घरं पुन्हा आपलं एकटीचं झाल्याचा आनंद होतो. तरीही आपण निरक्षर. ही एवढं शिकतेय याचा तिला मनातून रागही असतोच. ही हडळ दूर गेली, की शिकलेल्या बायकोची निरर्थकता जाणवेल आपल्या नवऱ्याला असा विचारही तिच्या मनात येऊन जातोच... हरीशना एका कॉलेजचे प्राचार्यपद मिळते. वीरमती सुटीतही घरी येण्याचे टाळते.

वीरमती लाहोरमधल्या स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेण्याचा प्रयत्न करते. एकदा मिरवणुकीवर पोलिस लाठीहल्ला करतात. आपण राष्ट्रकार्यात एखादी भूमिका घेतलीच पाहिजे. संपूर्ण राष्ट्रच आरोपीच्या पिंजऱ्यात असताना आपण क्षुल्लक घरगुती गोष्टींवरून झुरत राहतो - हे बरोबर नाही. आपण असहकाराची भूमिका घ्यायला हवी. लाहोरमधील वातावरण धुमसत राहते. वीरमतीला अतृतसरला नवऱ्याकडे जावे लागते...

ती राहत होती त्या भागात मुसलमानांचा हल्ला होणार अशी अफवा पसरते. तेव्हा वीरमतीची आईच तिला घरी बोलावते. पाकिस्तानातून हल्लेखोरांच्या तावडीतून सुटून आलेल्या विस्थापितांना खाऊ घालणे हे त्या घडीचं काम होतं. वीरमती इतर बायकांना स्वयपाकात मदत करु लागते. कैलाशच्या घरात लंगरची व्यवस्था करण्यात येते. घर गुंडाप्रुफ केले जाते. घराभोवतीची भिंत आठ फूट उंच नेण्यात येते. तारांची वेटोळी बसवण्यात येतात. वीरमतीला मुलगी होते. भारती हे नाव ठेवावे असे वीरमती सुचवते. गंगा परिस्थितीच्या तणावामुळे दुसऱ्या वस्तीत राहू लागते. हरीशला दिल्लीत प्राचार्यपद मिळते. अमृतसर सुटते. पण वीरमतीच्या दोन्ही घरातले संबंध ताणलेलेच राहिले.

उपसंहारात आपल्या आयुष्याचा ताळेबंद मांडताना इंदू म्हणते, ''आदर्श मुलगी होण्यासाठी झगडत मी मोठी झाले... रात्रंदिवस काहीतरी करायचं आहे याचा ताण मनावर असे. मी मोठी होत गेले तसतशी आईनं माझ्यावरची बंधनं कडक केली. माझ्याच भल्यासाठी ती हे करतेय असे ती म्हणे. त्यामुळेच की काय मी सतत सुटकेचे मार्ग शोधत राहिले. माझे लग्न पूर्णपणे फसले. घटस्फोटानंतर माझ्या आईने माझ्या प्रत्येक श्वासावर दु:खाचं आणि नापसंतीचं आवरण घातलं.



मी खूप काळ दु:ख, खिन्नपणा व निराशा यात गुरफटून गेले. रात्रीच्या रात्री जागून तळमळत काढल्या. स्वत:ची कीव करीत, आईला दोष देत पडून राही... आईच्या भूतकाळात स्वत:ला बुडवून घेऊन... मला समजू शकेल अशा स्त्रीचा मी शोध घेत राहिले. एकमेकांत मिसळलेल्या, अपूर्ण, विसंगत अशा आठवणींच्या गर्दीतून -एक इतिहास कल्पनेनं चितारला आहे. ज्या गोष्टी त्यात बसल्या नाहीत त्या टाकून दिल्या. ज्या बसत होत्या त्यांना हवा तसा आकार दिला. हे करताना काही शोध लागले. एक विलक्षण खळबळ जाणवली. ज्यांचा वारसा ओळखता येईल. अशा हकीगतीमधील आनंद भोगता आला... मायलेकींच्या नात्यांचा एक पट विणला गेला. माझ्या शब्दाशब्दांतून एक महाल बनत गेला. प्रत्येक शब्द हा जणू या महालातील एक वीट आहे. ममा, यात तू राहा आणि मला सोडून दे. या उपर मला झपाटू नकोस.''

मंजू कपूर यांच्या या अखेरच्या वक्तव्यावरून या कादंबरीतल्या घटनाव्यक्तींच्या वास्तवावर प्रकाश पडतो. स्वत:च्याच घराण्याच्या वाटचालीचा शोध घेताना त्यात जे काही भलेबुरे ताणतणाव व संघर्ष जाणवले, त्यांची आपल्या परीने उकल करण्याचा प्रयत्न त्या मागे आहे. त्यातूनच आपल्या व्यक्तित्वातील बऱ्यावाईट पैलूंची पाळेमुळे कुठे सापडतात याचाही मागोवा घेतला जातो. घरातल्या मुलींना आदर्श बनविण्याचा उद्योग घरोघर चालू असतो. तरीही मुली 'अवघड' ठरतात. डिफिकल्ट डॉटर्स ठरतात. घराण्याला अडचणीत आणतात.

मराठी कथाकादंबऱ्यातल्या मुलीही अशाच वागतात. पण त्यांच्याकडे पाहण्याचा आपल्या लेखकांचा दृष्टिकोन मंजू कपूरसारखा नसतो. त्यामुळे या पुस्तकाचे वेगळेपण आकृष्ट करते.

**किंमत : २००रु. सवलतीत : १६०रु.**

**सभासदांना : १५०रु. पोस्टेज : २५रु.**

# नवी स्पर्धा


खाली काही महत्त्वाच्या पुस्तकांची वर्णने करणारी वाक्ये दिली आहेत. या वाक्यावरून आपण पुस्तकांची नावे अचूक ओळखावयाची आहेत.

१) खांडेकरांची अपूर्ण राहिलेली तरी पूर्ण संदेश देणारी कादंबरी.
२) परिकथा, लोककथा यातून जाणवणारी फुलांची वैशिष्ट्ये आकर्षक शैलीत टिपण्याचा प्रयत्न.
३) कलावाद आणि रूपवाद याचे अधिक सम्यक व विस्ताराने घडणारे दर्शन.
४) गुन्हेगारी व व्यसने यांच्या प्रभावाखाली वावरणारे तरूण व त्यांची मानसिकता यांचे वास्तव दर्शन.
५) प्रत्येक क्षण आनंदाने जगण्याचा आणि दुसऱ्याला आनंद देण्याचा निर्धार.
६) एका अमेरिकन पत्रकार महिलेने जपानमधील बंडखोर स्त्रियांचा घेतलेला शोध.

बरोबर उत्तर पाठवणाऱ्यांपैकी लॉट टाकून येणाऱ्या पहिल्या तीन स्पर्धकांना आपल्या पसंतीचे प्रत्येकी १०० रुपयांचे पुस्तक बक्षीस.

**मुदत १५ एप्रिल २००२ पर्यंत**

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथ जगत,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०.




# अ मेथॉडिकल इंग्लिश ग्रामर

## अचूक, फर्डे इंग्लिश लिहिण्यात तुम्हाला पटाईत व्हायचेय का?

लेखक : **जी. डी. मोरे**

इंग्लिश ही आज जागतिक भाषा म्हणून सर्व भाषांना मागे सारून पुढे झेपावत आहे. विज्ञानाची व प्रगतीची भाषा म्हणून तिचे स्थान भक्कम होत आहे. परंतु इंग्रजीचा अनेक वर्षे अभ्यास करूनही ती आपल्याला अचूक लिहिता येत नाही, ही वस्तुस्थिती आहे. ती फार अवघड आहे म्हणायचे की नीट शिकवली जात नाही असे म्हणायचे? इंग्रजीच्या अध्ययनासाठी शेकडो पुस्तके निघत आहेत. तरी इंग्रजी आत्मसात करणे बहुसंख्य विद्यार्थ्यांना कष्टदायक ठरते.

'ए मेथॉडिकल इंग्लिश ग्रामर' हे जी.डी. मोरे यांचे पुस्तक इंग्रजी व्याकरणाच्या अध्ययन-अध्यापनाची एक नवी पद्धती (मेथड) पेश करते.

व्याकरण म्हणजे शब्दांचे व वाक्यांचे नियम सांगणारे शास्त्र असे मानले जाते. परंतु केवळ नियम माहित झाले तरी भाषा शुद्ध अचूक लिहिता येतेच असे नाही असा एक शिक्षक म्हणून जी.डी.मोरे यांना सारखा अनुभव येत गेला. विद्यार्थी वर्षानुवर्षे इंग्रजीचा एक विषय म्हणून अभ्यास करतात, परंतु त्यांना इंग्लिश बोलणे जड जाते आणि इंग्रजीत आपले विचार नीट मांडता येत नाहीत असे आढळून आले.

मुलांच्या मनात इंग्रजीबद्दल आत्मविश्वास का निर्माण होत नाही, त्यांना इंग्रजी अचूक व व्यवस्थित का बोलता येत नाही, त्यांच्या लेखनात वाक्यरचनेच्या दृष्टीने गफलती का राहतात असा मोरे यांना प्रश्न पडला.

इंग्रजी शिकवण्याच्या आपल्या पद्धतीत काही त्रुटी वा उणिवा आहेत का असा प्रश्न त्यांनी स्वत:लाच विचारला. विद्यार्थ्यांच्या भूमिकेतून इंग्रजीचा त्यांनी विचार केला; आणि इंग्रजीच्या आकलन आविष्कारातील अडचणी जाणून घेतल्या. विद्यार्थी चुका नेमक्या कुठे करतात याचा शोध घेतला. आणि इंग्रजी शिकवण्याची एक नवी मेथड त्यांनी विकसित केली.

या नव्या मेथडचा अवलंब केल्याने विद्यार्थ्यांना इंग्रजीबद्दल विद्यार्थ्यांना गोडी वाटते, जिज्ञासा उत्पन्न होते आणि आत्मविश्वास वाढतो, स्पर्धा परीक्षांमध्ये ती चमकतात हे त्यांच्या लक्षात आले. तेव्हा आपली ही इंग्रजी शिकवण्याची मेथड पुस्तकरूपात मांडून, सर्वदूर न्यावी असे त्यांनी ठरवले आणि परिश्रमपूर्वक 'ए मेथॉडिकल इंग्लिश ग्रामर' या पुस्तकाची निर्मिती केली.



व्याकरण म्हटल्यावर नाम, सर्वनामे, विशेषणे, क्रियाविशेषणे, क्रियापदे, काळ, शब्दयोगी अव्यये, वाक्यरूपांतर, कृदन्ते व धातुसाधिते, वाक्यरचना, वाक्यपृथक्करण, वाक्यसंयोग वगैरे मूलभूत बाबी समोर येतात. त्या सर्वांबाबत काही सहजसुगम ठोकताळे मोरे यांनी मांडलेले आहेत आणि ते ठोकताळे आत्मसात केले तर इंग्लिश वाक्यरचनेची भीती वाटणार नाही असे म्हणता येईल.

इंग्लिशचे बारकावे मोरे यांनी मराठीत समजावून दिले आहेत. पारिभाषिक शब्दांचा अडसर त्यात जाणवत नाही. तसेच प्रत्येक मुद्दा मांडताना भरपूर उदाहरणे दिली आहेत. शिवाय सरावासाठी १२७ प्रश्नसंग्रह दिले आहेत. त्या प्रश्नसंग्रहाची उत्तरेही दिली आहेत. सातवी ते दहावी अशा चारही वर्षांत हे पुस्तक अभ्यासत राहिले तर इंग्रजीचा पाया पक्का होईल आणि दहावीत तर उत्तम गुण मिळतीलच. कनिष्ठ महाविद्यालयात म्हणजे अकरावी बारावीत इंग्रजीत कुठलाही विषय आत्मसात करणे सुलभ जाईल. स्पर्धात्मक परीक्षांनाही या पुस्तकामुळे बेधडक सामोरे जाता येईल.

ध्वनींच्या सहाय्याने भावना व्यक्त करताना माणसाने ध्वनींना विशिष्ट ध्वनिचिन्हे दिली. ध्वनी तरल तर ध्वनिचिन्हे स्थितीशील असल्याने उच्चार करण्याच्या पद्धतीत सूक्ष्म बदल झाले तरी ध्वनिचिन्ह मात्र तेच राहते. इंग्रजीतील स्वर ए, ई, आय, ओ, आणि यू हे पाचच असले तरी त्यांचे उच्चार भिन्नभिन्न होतात. या ५ लिखितांचे २० निरनिराळे उच्चार होतात. तर व्यंजनांचे २४ उच्चार होतात. हे उच्चार कसे होतात हे अचूक कळण्यासाठी इंग्लिश डिक्शनरीत फोनेटिक सिम्बॉल्स वापरण्यात येतात. त्या फोनेटिक सिम्बॉल्सची माहिती व्यवस्थित घेतली तर इंग्रजी शब्दांचे उच्चार अचूक होऊ शकतील. बारा शुद्ध स्वर, आठ संधिस्वर आणि २४ व्यंजने या सर्वांच्या फोनेटिक खुणांमुळे शब्दांचे जे उच्चारानुसारी रूपही (ट्रॅन्सक्रिप्शन) डिक्शनरीत दिलेले असते, तेही आत्मसात करणे सोपे जाते. इंग्रजीत प्रत्येक शब्दावरील विशिष्ट अक्षरावर आघात दिला जातो. तो आघात लक्षात घेऊन बोलले तरच उच्चार बरोबर होईल. त्यासाठीही काही खुणा वापरल्या जातात. या खुणा वापरून इंग्लिशमध्ये लिहिलेले शब्द आपल्या चिरपरिचित रूपांपेक्षा वेगळे वाटतात. परंतु आरंभीच त्यांचे व्यवस्थित आकलन केले तर उच्चारांबाबतचा गोंधळ मनात उरत नाही.

क्रियापदांची विविधता हा इंग्रजी भाषेतील एक विलक्षण गुंतागुंतींचा प्रकार आहे. मोरे यांनी त्यातले गुंते उलगडून दाखवण्यासाठी १०८ सूत्रे सांगितली आहेत. सत्तर पृष्ठे त्यासाठी घेतलेली आहेत. एकाच क्रियापदाचे शब्दयोगी अव्ययाच्या साहचर्याने वेगवेगळे अर्थ संभवतात. उदाहरणार्थ, टू पास म्हणजे पुढे जाणे, वेळ घालविणे, उत्तीर्ण होणे, टू पास इन (च्यामध्ये उत्तीर्ण होणे), टू पास बाय (च्या बाजूने जाणे), टू पास ऑन (पुढे जाऊ देणे), टू पास इन्टू (अवस्थांतर होणे), टू पास ऑफ (घटना घडणे), टू पास थ्रू (च्या मधून जाणे), टू पास आवे (मृत्यू होणे).

इंग्रजीत शब्दयोगी अव्यये मराठीतील विभक्ती प्रत्ययाचे काम करतात आणि क्रियापदाचा अर्थही निश्चित करतात किंवा अर्थ बदलून टाकतात (उदा. पास आवे म्हणजे मरणे)

मोरे यांनी शब्दयोगी अव्ययाच्या साहचर्याने येणाऱ्या क्रियापदांची, नामांची व पन्नास पृष्ठांचे आहे. डायरेक्ट-इनडायरेक्ट (३०पृष्ठे), हे प्रकरणही २५ उपयुक्त सूत्रांच्या आधारे या विषयातील बारकावे समजावून देणारे आह.

इंग्लिश ही जगातली सर्वात अवघड भाषा असावी असे तिची देशादेशागणिक जी रूपे दिसतात, त्यावरून जाणवते. भारतात तर 'हिंग्लिश'(हिंदी व इंग्लिश यांची सरभेसळ) प्रचलित होऊ पाहत आहे. दक्षिणेतील लोकांचे इंग्रजी उच्चार, उत्तरेतील भैय्याचे इंग्रजी उच्चार, बंगाली

लोकांचे 'ओ'कारान्त इंग्रजी शब्दोच्चार आणि मराठी माणसाचे इंग्रजी उच्चार -सर्वात वेगळेपण आहे. पुन्हा आपण जे इंग्रजी बोलतो ते इंग्लंडमधल्या लोकांना गेल्या शतकातले व्हिक्टोरीयन इंग्लिश वाटते. ते तेथे आता कालबाह्य झाले आहे. अमेरिकन लोकांचा खाक्या आणखीच वेगळा आहे. त्यांचे इंग्रजी पुन्हा वेगळेच आहे. उच्चारभिन्नता असली तरी इंग्रजीचे लेखन मात्र प्रमाणभाषेत होते; त्यामुळे जगभर ती कळू शकते. महाराष्ट्रात तर आता इंग्रजी पहिलीपासून शिकवण्यात येते. जर आपल्या मुलांना शुद्ध व अचूक मराठी आले तर ती जगभर कुठेही उत्तम नोकरदार ठरू शकतील, व जम बसवू शकतील.

मोरे यांचे हे पुस्तक इंग्रजी व्याकरणातले बारकावे समजावून देते. शिक्षकांनीही त्याचे अध्ययन केले तर त्यांच्या शिकवण्यात बदल घडू शकेल; आणि आपण शिकवतोय ते मुलांना कळतेय या गोष्टीचा आंनद त्यांना अनुभवता येईल.

त्याचप्रमाणे सातवीपासूनच मुलांनी हे पुस्तक वापरले तर दहावीत इंग्रजीचा गड सर करणे त्यांना अवघड जाणार नाही. अनुभवी जागरुक शिक्षकाला प्रयोग करता करता सापडलेले ठोकताळे व मार्ग या पुस्तकात आलेले आहेत. म्हणून त्याचे मोल मोठे आहे.

**किंमत : ११०रु. सवलतीत : ९४ रु.**
**सभासदांना : ८३ रु. पोस्टेज : २०रु.**


**मेहता मराठी ग्रंथजगत**

दि रजिस्ट्रेशन ॲक्ट ऑफ न्यूजपेपर्स (सेंट्रल) रुल्स १९५६

नियम क्र. ८ अन्वये निवेदन **फॉर्म ४**

| | | |
|---|---|---|
| १) प्रकाशन स्थळ | : | मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, पुणे-३०. |
| २) प्रकाशन काल | : | मासिक |
| ३) मुद्रक, प्रकाशक व संपादक | : | सुनील मेहता, १२१६, सदाशिव पेठ, पुणे-३०. |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| ४) प्रकाशनाची मालकी | : | सुनील मेहता, १२१६, सदाशिव पेठ, पुणे-३०. |

मी, सुनील अनिल मेहता, असे घोषित करतो की वर दिलेला तपशील माझ्या समजुतीप्रमाणे व माहितीप्रमाणे बरोबर आहे.

दि. १५-३-२००२

सुनील मेहता
प्रकाशक




# श्रद्धांजली

## 'अभिरुची'कार बाबुराव चित्रे

आधुनिक मराठी वाङ्मयाच्या पर्वात लक्षणीय ठरलेल्या 'अभिरुची'या प्रसिद्ध नियतकालिकाचे कर्ते आणि संपादक पु.आ.ऊर्फ बाबुराव चित्रे यांचे आज दुपारी एकच्या सुमारास दि. २४ फेब्रुवारी रोजी गोरेगावमधील त्यांच्या निवासस्थानी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८८ वर्षाचे होते. त्यांच्या पक्षात साहित्यिक दिलीप चित्रे यांच्यासह चार पुत्र आणि तीन कन्या आहेत.

पु.ल. देशपांडे, बा. सी. मर्ढेकर, इरावती कर्वे, व्यकंटेश माडगूळकर, गंगाधर गाडगीळ, पु.शि. रेगे, ना.घ. देशपांडे, आदी मराठी सारस्वतातील नामवंतांच्या उमेदीच्या काळातील लिखाणाला आणी प्रसिद्ध चित्रकार द.ग. गोडसे यांच्या कुंचल्याला आवर्जून प्रसिद्धी देणाऱ्या बाबुराव चित्रे यांनी 'अभिरुची'ला काही कळातच एक आगळा दर्जा मिळवून दिला आणि मराठी रसिकांच्या पसंतीस हे नियतकालिक उतरले. अभिरुचीद्वारे वाचकांपुढे दर्जेदार साहित्य आणण्याची परंपरा बाबुरावांनी अखेरपर्यंत कायम राखली. देश स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असताना बडोद्यात १९४३ साली आपली पुंजी लावून 'अभिरुची' सुरू करणाऱ्या बाबुराव चित्रे यांनी सलग ९ वर्षे अभिरुचीचा धडाका उत्कृष्ट मुखपृष्ठे, उत्तमोत्तम कविता आणि अभिनव साहित्यासह कायम राखला. त्यानंतर स्थलांतर करून मुंबईत दाखल झाल्यावरही चित्रे यांनी अभिरुचीचे संपादन आणि प्रकाशन पत्नी विमल चित्रे यांच्या साह्याने सुरू ठेवले. ते काही वर्षांचा अपवाद वगळता २००० सालापर्यंत सुरू होते. साहित्यातील नवजाणिवांचे जोमदार वारे 'अभिरुची'त दाखल करून घेणाऱ्या चित्रे यांच्या या कामगिरीचा मराठी वाङमयक्षेत्रातील प्रभाव एवढा लक्षणीय होता की, पु.लं. नी देखील साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून त्याचा उल्लेख 'अभिरुची पर्व' असा केला होता. व्यकंटेश माडगूळकर, गंगाधर गाडगीळ यांनीही आपल्या कथांचा पहिला हंगाम अभिरुचीतच फुलवला तर इरावती कर्वे यांचे ललित लेखन अभिरुचीने मराठी वाचकांपुढे आणले.

बाबुराव चित्रे यांच्या निधनाने अतूट असा स्नेहबंध असलेले व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे, अशी शोकभावना मं.वि.राजाध्यक्ष यांनी व्यक्त केली. ज्या नियतकालिकाने आमच्या पिढीची अभिरुची घडवली, एक चांगला संस्कार केला त्या नियतकालिकाचे आमच्यावरील ऋण कधीही न फिटणारे असे आहे, अशा भावना माजी साहित्य संमेलनाध्यक्ष आणि ज्येष्ठ समीक्षक विजया राजाध्यक्ष यांनी बोलून दाखविल्या.



# फुले आणि काटे

**प्रमाण मराठीच्या व्यासपीठाबरोबर लोकभाषांची लोकपीठे कार्यरत राहणेही श्रेयस्कर**

'ग्रामीणत्वाचे, दलितत्वाचे, आदिवासी असण्याचे भांडवल कशाला?' असा सवाल अलिकडे एका अध्यक्षीय भाषणातून करण्यात आला. कदाचित हा सवाल वाङ्मयापोटी असला तरी, या सर्व वाङ्मयीन चळवळींची मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी काही काळ तरी आवश्यकता आहे. गेल्या तीन-चार दशकांपासून मराठी साहित्यात आदिवासी कवितेचा प्रवाह झुळझुळ वाहत आहे. आदिवासी कविता निसर्गाधिष्ठित, निकोप आणि खास देशी संस्कृतीचे लेणे ल्यालेली कविता आहे. या प्रवाहाची दखल घेणे मला सर्वाधिक महत्त्वाचे वाटते कारण ह्या गोंडवनातच त्या साहित्याची सर्वार्थाने निर्मिती झाली आहे. आंबेडकरवाद, देशीवादासारखे मराठी साहित्य व्यवहारातून उद्भवलेले वाद, पाश्चात्य साहित्यावरून बेतलेले आणि गाजविलेले वाद आहेत. मराठी साहित्यातील वादचर्चा ही इंग्रजाळलेल्या समीक्षकांची रोजगार हमी योजना आहे. येथील भौतिक परिस्थिती, येथील लोक-लौकिक परंपरा, सांस्कृतिक पर्यावरण, वाङ्मयीन व्यवहार आणि कलावंताव्या सृजनशील प्रवृत्तींचा विचार न करता केवळ पाश्चात्य वाङ्मय नजरेसमोर ठेवून केलेली वादचर्चा वांझ आहे.

विविध जाती-जमातींची साहित्य संमेलने भरत असल्याने घाबरण्याचे कारण नाही. प्रमाण मराठीच्या व्यासपीठांबरोबरच लोकभाषांची लोकपीठे कार्यरत राहिल्याने वाङ्मयीन वातावरण गजबजून उठेल.

मतांसाठी शेतकऱ्यांचा पुळका सर्वांनाच येतो. प्रत्येक वर्षी शेतकऱ्यांची परिस्थिती ढासळत चालली आहे याचे विदारक दर्शन मात्र फक्त ग्रामीण साहित्यातूनच घडवले जाते. कृषी-कृषकांच्या वेदनांना वाचा फोडणारी ग्रामीण साहित्याची चळवळही जगणे आवश्यक आह.

काल रंजनाच्या आहारी गेलेले कवी आज वास्तवाकडे वळले आहेत. सौंदर्यवाद्यांना झिडकारताना अनिल पाटील हा कवी म्हणतो-

अरे, बस झाल्या आता
पानाफुलावरच्या, शहरी
मानसाईवर बेतलेल्या कविता
दिसत कसा नाई तुमाले
ढोरावानी जीनं जगणारा
माणूस जिता जागता!



आपण कुणाचे प्रतिनिधी आहोत हे त्यांना कळले आहे आणि त्यांची भूमिका ठिसूळ नाही. कृषी परंपरेतून आलेली मौखिक परंपरा गेय आहे म्हणून गेय कविता ग्रामीण कवींच्या कंठातून पाझरते. त्यांना 'मंचीय कवी' म्हणून हिणवणे बेरकीपणाचे लक्षण आहे. रविकिरण मंडळाची परंपरा गेय होती. त्यांच्या कविता मंचकीय कविता ठरतात का? मराठमोळ्या भद्रजीवनात अभद्र कवितांनी थोडा धुमाकूळ घातल्यानंतर वऱ्हाडी कवी विठ्ठल वाघांनी सामाजिक जाणिवेतून एक गेय पायवाट मराठी कवितेला दिली.

आता अनेकांची ती वहिवाट झाली. मीरा ठाकरे, शंकर बडे, गोपानारायण, शैलजा गावंडे, प्रतिमा इंगोले, विठ्ठल कुलट, राजेश महल्ले अशी ही नामावळी खूप लांबविता येईल. अशा विविध चळवळीतून... संमेलनांमधूनच भाषाभिवृद्धी होत जाईल पण त्यासाठी शासनानेही थोडा उदारपणा दाखविला पाहिजे.

अखिल भारतीय पातळीवरील साहित्य संमेलनास लाखो रुपयांचे अनुवाद दिले जाते. त्यांचे अनुदान कमी करा असे मी म्हणणार नाही. परंतु उत्सवी संमेलनापेक्षा उत्साही लोकांची दखल घेणे आवश्यक वाटते. जिल्हा पातळीवरील छोट्या छोट्या संमेलनास शासनाने अनुदान देऊन अनुग्रह करावा.

झाडी मंडळात झाडीबोलीचे संवर्धन करणारे झाडीबोली संमेलन, नवोदितांचे अंकुर साहित्य संमेलन, आदिवासी साहित्य संमेलन, मुस्लिम मराठी साहित्य संमेलन, जनसाहित्य परिषदेचे जनसाहित्य संमेलनासारख्या वाङ्मयीन चळवळी चालण्यासाठी २५-५० हजारांची मदत करावी. नोंदणी-हिशेब सादर करण्याचा दंडक मात्र घालावा. द.सा. बोरकर, हरिश्चंद्र बोरकर, राजन जयस्वाल, सुभाष सावरकर, विनायक तुमराम, शेख हाशम इत्यादींच्या वाङ्मयीन चळवळींना त्यामुळे संजीवन शक्ती मिळेल आणि वाचन संस्कृती वाढेल.

कविवर्य सुरेश भट, ग्रेस, यशवंत मनोहर, सुधाकर गायधनी, ज्योती लांजेवार, लोकनाथ यशवंत, श्रीधर शनवारे, नारायण कुळकर्णी कवठेकर, बबन सराडकर, ज्ञानेश वाकुडकर, कृष्णा चौधरी ह्या काव्यक्षेत्रात स्थिरावलेल्या मंडळींनंतर श्रीकृष्ण राऊत, अशोक थोरात, रेषा, देवानंद गोरडे, अरविंद पोहरकर, माधुरी अशिरगडे यांच्या काव्यनिर्मितीस विविधांगी भान आहे.

'वापरा आणि फेका' या पाश्चात्य बाजारू वृत्तीने विविध वाहिन्यांच्या माध्यमातून आमच्या त्यागी जीवनावर फुली मारण्याचा प्रयत्न चालविला आहे. हे नवे आव्हान हाणून पाडण्याचे कार्य संवेदनशील वृत्तीचे कवीच करू शकतात.

'महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मराठीचे एक वाक्य नीट लिहिता येत नाही' हा अलिकडे प्रा. भास्कर नंदनवारांनी काढलेला निष्कर्ष लक्षात घेता शुद्धलेखनाची चळवळ राबविण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. डॉ. मनोहर रोकडे, डॉ. भाऊ मांडवकरांनी या बाबीकडे सातत्याने लक्ष वेधले आहे. शुद्धलेखनाचा पुनर्विचार करण्याची नितांत गरज असून त्यासाठी संस्कृतच्या पारंपरिक गुलामगिरीतून मराठीला मुक्त करण्यासाठी राज्य पातळीवर चळवळ उभी करणे आवश्यक झाले आहे.

नवी पिढी वाचनसंस्कृतीपासून दूर जात आहे हे एक विदारक सत्य. बालवाङ्मयाची आम्ही चालविलेली उपेक्षा आम्हास महागात पडणार आहे. बालवाङ्मय लिहिणाऱ्या लेखकास आम्ही प्रतिष्ठाच जर दिली नाही तर वालवाङ्मयाकडे फारसे कुणी वळणार नाही. बालवाङ्मयास शासन पुरस्कार देते पण साहित्य संमेलनाच्या भाऊगर्दीत बालकांचा विसर पडतो. साहित्य

संमेलनाच्या व्यासपीठावर बालवाङ्मयाचा विचार झाला पाहिजे. नुसत्या विज्ञानाचा भडिमार करून चालणार नाही. पर्यावरणाचे महत्त्व नव्या पिढीवर बिंबवण्याची कामगिरी बालवाङ्मयास पार पाडावी लागेल.

आज कोणताही प्रकाशक काव्यसंग्रह प्रकाशित करण्यास उत्सुक नसतो. सर्वाधिक खप असलेला वाङ्मय प्रकार म्हणजे कादंबरी. विस्तृत अवकाशाचा पट असल्याने भौतिक जीवन व्यवहाराचे प्रतिबिंब कांदबरीमध्ये मोठ्या प्रमाणात उमटते. साठीनंतरच्या उद्धव शेळके, मनोहर तल्हार यांच्यानंतर कांदबरी क्षेत्रात काहींनी चांगले योगदान दिले. आशा बगे, सुरेश द्वादशीवार, पुरुषोत्तम बोरकर, सदानंद देशमुख, बाबाराव मुसळे, नामदेव कांबळे, किशोर सानप, सुभाष सावरकर आणि रवींद्र शोभणे यांनी चांगल्या कलाकृती रसिकांना दिल्यात. माझ्या 'झेलझपाट' आणि 'सिलिपशेरा' या कादंबऱ्या भल्या का बुऱ्या हे आपण ठरवावे.

समीक्षेचा प्रांत हा प्रतिष्ठेचा प्रांत आहे. आपल्या कलाकृतीची भलावण समीक्षकांनी करावी, निदान तिच्यावर भले-बुरे कुणी तरी लिहावे यासाठी प्रत्येकाची धडपड असते. या क्षेत्रात मात्र फारशी गर्दी नाही. डॉ. द. भि. कुळकर्णी आणि डॉ. भा. ल. भोळे यांच्यानंतर अक्षयकुमार काळे, आशा सावदेकर, सुभाष सावरकर, किशोर सानप, प्रा. प्रमोद मुनघाटे, डॉ. रा. गो. चवरे, सतीश तराळ, वि. स. जोग, प्रा. देवानंद सोनटक्के, मनोज तायडे हे चांगली समीक्षा करू शकतात; पण त्यांच्यात सातत्य नाही.

मराठी वाङ्मयाच्या पुनर्लेखनाची आवश्यकता आहे. वाङ्मयेतिहासाचे लेखन तटस्थ वृत्तीने झालेले नाही. वाङ्मयेतिहासाचे लेखन करणाऱ्यांच्या जातीय कळवळ्यातून उफाळून आलेला 'आपलेपणा', प्रादेशिकतेच्या उमाळ्यातून आलेला 'कुबटपणा' जागोजाग दिसतो. सुमार लेखकांना दिवाणखान्यात बसविण्याचा दिलेरपणा नि सक्षम लेखकांना सांदी कोपऱ्यात लोटण्याचा कुजटपणा यामुळे हे वाङ्मयेतिहासाचे ग्रंथ कालबाह्य झाले आहेत. त्यातल्या त्यात डॉ. अ. ना. देशपांडे यांचा वाङ्मयेतिहास दिलासा देणारा असला तरी तो पुरेसा नाही.

**डॉ. मधुकर वाकोडे**

**(५३व्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणातून)**

## कोंकणीसारख्या लहान भाषेसमोरील अस्तित्वाचा प्रश्न आणखी तीव्र

कोंकणी भाषेच्या लढ्यात अग्रक्रमाने भाग घेतलेल्या ख्रिस्ती समाजाने या भाषेची सोडलेली कास, रोमन लिपीच्या पुरस्कर्त्यांनी व्यक्त केलेला असंतोष व बंद पडत असलेल्या कोंकणी शाळा या प्रश्नांचा गंभीर विचार करावाच लागेल.

कोंकणीला राजभाषेचा मान देणारा कायदा १५ वर्षापूर्वी संमत झाला तो दिवस ४ फेब्रुवारी गोव्यात कोंकणी अकादमी या सरकारने स्थापन केलेल्या स्वायत्त संस्थेतर्फे साजरा केला जातो. पण सरकारने अजून या कायद्याची अंमलबजावणी केलेली नाही. सरकारी पातळीवर या दिवशी राज्योत्सव साजरा करण्याच्या कोंकणी समर्थकांच्या मागणीची सरकारने दखल घेतलेली नाही. त्याचप्रमाणे निष्क्रिय कोंकणी अकादमीलाही लोकांचा मोठा सहभाग असलेला कार्यक्रम त्यादिवशी अजून साजरा करता आलेला नाही. एखादे पुस्तकप्रकाशन व काही ठराविक वक्त्यांची भाषणे यापलीकडे या सोहळ्याला अजून भव्यदिव्य स्वरूप आलेले नाही. कोंकणी नेत्यांमधील लाथाळ्या व एका मोठ्या समाजाने या चळवळीतून काढून घेतलेले अंग ही या उदासीनतेची



कारणे आहेत.

देवनागरी भाषेला सरकारी मान्यता मिळविताना दिलेल्या आश्वासनांना हिंदू नेत्यांनी हरताळ फासला असल्याची खंत आपले व्यवहार रोमन कोंकणी भाषेतून करणाऱ्या ख्रिस्ती समाजाला असून गेल्या अनेक वर्षांचा असंतोष हा समाज आता व्यक्त करू लागला आहे. काही प्रमख लेखकांनी तसेच अ. भा. कोंकणी परिषदेचे अध्यक्ष पुंडलिक नायक यांनी त्यांच्याशी एकवाक्यता दाखविल्याने हा वाद आता चव्हाट्यावर आला आहे.

गोवा कोंकण अकादमीचे अध्यक्ष उदय भेंब्रे यांनी अलीकडेच गोव्याच्या संस्कृतीच्या ऱ्हासाबद्दल बोलताना कोंकणी भाषेच्या प्रत्येक आंदोलनात निष्ठेने साथ केलेल्या ख्रिस्ती समाजावर आगपाखड केली. त्यामुळे या समाजाच्या जखमेवर मीठ चोळले गेले, अशी भावना निर्माण झाली आहे. ख्रिश्चनांनी कोंकणी भाषेसह गोव्याच्या संस्कृतीकडे पाठ फिरविल्याचा आरोप भेंब्रे यांनी केला. ते म्हणतात, ख्रिस्ती समाजाने कोंकणी बोलणे सोडून दिले असून तिचा ते कोणत्याही प्रकारे वापर करीत नाहीत. कोंकणीच्या सांस्कृतिक प्रकारांशीही त्यांनी संबंध ठेवलेला नसून त्यांना स्वत:चे पाश्चात्यीकरण करून घेण्यात रस आहे. ख्रिस्ती कलाकारांवरही आसूड ओढताना त्यांची तियात्र ही रंगभूमी लोकप्रिय आहे; पण कलाकार पडद्यामागे इंग्रजी बोलतात, असे भेंब्रे यांनी म्हटले आहे. ख्रिस्ती धर्मसंस्थेवर दुगाण्या झाडताना चर्चही आता कोंकणीशी फटकून वागते व तिला गोव्याच्या स्वतंत्र अस्तित्वाशी सोयरसुतक नाही. डायोसिजन संस्था सरकारी निधी मिळविण्यासाठी कोंकणी माध्यम स्वीकारल्याचा आव आणते... कोंकणीची कास सोडल्याने या समाजात न्यूनगंड वाढीस लागला असून गोवा तसेच भारतापासून ते तुटत चालले आहेत...

या विचारांना तियात्र रंगभूमीवरील आघाडीचे कलाकार व गोवा विधानसभेचे माजी अध्यक्ष तोमाझिनो कार्दोज यांनी प्रखर विरोध केला. ते म्हणाले : ख्रिस्ती समाज शेकडो वर्षांपासून रोमन कोंकणीतून व्यवहार करीत आहे. देवनागरीला राजभाषेचा दर्जा मिळविताना रोमनवाल्यांना सांभाळून घेण्याचे वचन कोंकणी नेत्यांनी दिले होते. पण स्वत:चा स्वार्थ साधल्यानंतर ते आम्हाला सोयीस्कररीत्या विसरले. देवनागरीचा वापर बहुतांशी हिंदू समाजच करतो यात तथ्य असून ख्रिश्चनांची तरुण पिढी वगळता जुनी पिढी लेखनाचा मार्गच सुटल्याने अस्वस्थ आहे. जुन्या पिढीतील अनेक सिद्धहस्त लेखकांना साहित्य अकादमी व देवनागरीतील इतर प्रतिष्ठित पुरस्कार मिळू न शकल्यानेही ते नाराज आहेत. कार्दोज म्हणाले: आमची तोंडे बंद करताना रोमन लिपीतील उत्कृष्ट साहित्य देवनागरीत आणण्याचे वचन आम्हाला देण्यात आले होते पण त्याला वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या. यावर साहित्य अकादमीच्या कार्यकारी मंडळाचे कोंकणी भाषेचे सदस्य फेलिसियु कार्दोज यांचे मत असे की रोमन कोंकणीतील साहित्य वाईट दर्जाचे असून ते पुरस्काराच्या लायकीचे नाही.

यावर मतभेद व्यक्त करताना अ. भा. कोंकणी परिषदेचे अध्यक्ष पुंडलिक नायक यांनी म्हटले की रोमन लिपीतील सर्वच साहित्य वाईट असा शिक्का मारता येणार नाही. तशी देवनागरीतही सर्वच पुस्तके लायक कुठे आहेत? कोंकणीतील पुरस्कार केवळ एका विशिष्ट जातीला मिळाले, अशी जी टीका होते त्यात तथ्य आहे. त्यासाठी त्यांचे साहित्य जमविण्यात येऊन पुस्तके प्रकाशित करण्यात आली. रोमन लिपीतील साहित्यिकांबाबत सारे उदासीन राहिले. कोंकणी नेत्यांनी रोमन लिपीच्या पुरस्कर्त्यांना सामावून घेतले नाही. भेंब्रे यांच्यावर टीका करताना नायक म्हणाले की यापूर्वी रवींद्र केळेकर यांनी हा मुद्दा मांडला होता. ख्रिस्तींनी कोंकणीपासून

फारकत घेतल्याचा मुद्दा मी स्वत: परिषदेच्या व्यासपीठावरून मांडला होता. पण त्यावेळी भेंब्रे यांनी कोंकणी दैनिकात तीन अग्रलेख लिहून माझ्यावर हल्ला चढविला होता.

रोमन लेखकांच्या तुलनेने कन्नड लिपीत लिहिणाऱ्या मुंबई व कर्नाटकातील लेखकांचा साहित्य अकादमीच्या पुरस्कारासाठी विचार करण्यात आला. मुंबईचे जे. बी. मोराईस, जे. बी. सिक्वेरा व मंगळूरमधील चाफ्रा डिकॉस्ता यांची पुस्तके देवनागरीत प्रकाशित करण्यात येऊन त्यांना पुरस्कार देण्यात आले. पण गोव्याने 'दादा'ची भूमिका घेतल्यावरून कोंकणीची ही राज्येही सध्या नाराज आहेत.

कोंकणी केंद्राचे कार्यदर्शी फा. प्रताप नायक म्हणाले: देवनागरी लिपीचा स्वीकार केल्यानंतर देवाणघेवाणीच्या तत्त्वानुसार ख्रिश्चनांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न व्हायला हवे होते. त्याचप्रमाणे ख्रिश्चनांनी रोमन लिपीचा त्याग करावा, असे ते म्हणतात तेव्हा हिंदूंनी मराठी सोडली का, हेसुद्धा पहावे लागेल. हिंदू बहुजन समाज अजूनही मराठीबरोबर आहे असे सांगून ते म्हणाले: कोंकणीमधील लहान मुलांचे एकमेव मासिक बंद पडले आहे व हिंदू कोंकणी दैनिकही खपत नाही. त्यांना खरीच कोंकणी हवी आहे का, हा प्रश्न महत्त्वाचा असून ही भाषा कोणीच अभिमानाने बोलत नाही. प्रसिद्ध विचारवंत रवींद्र केळेकर म्हणाले, गोव्यातील हिंदूंची परंपरा मराठीच होती. हिंदू एक भाषा सोडून कोंकणीकडे आले आहेत व त्यांनी नवी कोंकणी परंपरा घडविली आहे, असे असताना केवळ लिपी सोडण्यास इतर कोंकणी पोटसमाजांना का अडचण वाटावी? ते पुढे म्हणाले की, रोमन लिपीत सकस लेखन करणारे आज कोण आहेत? त्यांचे एकमेव रोमन मासिक 'गुलाब' केवळ देवनागरीतील लेखकांचे साहित्य प्रकाशित करते.

कोंकणी शाळा चालविण्याच्या बाबतीत बोलताना फा. प्रताप नायक म्हणाले की ख्रिस्ती डायोसिजनतर्फेच आज गोव्यात बहुसंख्य शाळा चालविल्या जातात. कोंकणी शाळांकडे लोकांनी पाठ फिरविल्याचे निर्दशनास आणले असता तोमाझिन कार्दोज म्हणाले : डायोसिजनच्या शाळांच्या निकट इंग्रजी शाळांना मान्यता दिली जाते, तेव्हा या शाळा कशा चालणार? कोंकणी राजभाषा असूनही गोव्यात शिक्षणात कोंकणी विषय सक्तीचा नाही, अशी खंत फा. नायक यांनी व्यक्त केली. त्यांच्या मते, भाषेच्या विकासाचा पक्का आराखडा तयार करून कालबद्ध योजना आखल्याशिवाय या भाषेचे काही खरे नाही.

राजू नायक, (लोकसत्तावरून)

### उत्कर्षचे सु.वा.जोशी यांचे अभिनंदन

मराठी प्रकाशक संमेलनाचे दहावे अधिवेशन औरंगाबाद येथे दि.२३-२४ फेब्रुवारी रोजी झाले. त्याचे अध्यक्ष म्हणून उत्कर्ष प्रकाशनचे सुधाकर जोशी यांची निवड झाली. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. चित्रशाळा प्रेसचे वासुकाका जोशी हे त्यांच्या वडिलांचे काका. टर्नरफिटरचा कोर्स करून चित्रशाळेजवळच जुनी पुस्तके व रद्दी विकण्याचा व्यवसाय त्यांनी सुरू केला. पानशेतच्या पुरात त्यांच्या दुकानाची रद्दी झाली. आजच्या गरवारे पुलाजवळ त्यांनी खोके टाकले. त्या खोक्याच्या जागी हाँगकाँग गल्लीत अजूनही त्यांचा तो गाळा आहे. १९६१ नंतर आज ते ज्या जागेत आहेत तेथे आले.१९७१ मध्ये प्रकाशन सुरू केले. व्यंकटेश माडगूळकर, भा.रा.भागवत, शांता शेळके वगैरे त्याचे खास लेखक. आळंदीच्या ज्ञानेश्वर मंदिर देवस्थानचे ते मुख्य विश्वस्त आहेत. सर्वांची मर्जी राखून मोठेच गुडवुईल संपादन केले आहे. त्यांची निवड म्हणूनच अभिनंदनीय ठरते.



# स्पर्धा निकाल

**नोव्हेंबर स्पर्धा निकाल**

**जोड्या जुळवा-** रवींद्र बागडे- गटुळं, विमल मोरे-तीन दगडाची चूल, हुसेन दलवाई-क्षितिजे अपार, शोभा डे- सिलेक्टिव्ह मेमरी, उत्तम बंडू तुपे-काट्यावरची पोटं, बी.जी. शिर्के-जिद्द, शाहीर विठ्ठल उमप-फु बाई फू, प्रोतिमा बेदी-टाईमपास, अब्दुल कलाम-अग्निपंख

**यशस्वी स्पर्धक**

१) **मधुसूदन वा. सराफ**, सी-१/५६/६, श्रीरंग सोसायटी, ठाणे (प) ४००६०१.
२) **राजश्री सपार,** विणकर सोसा. ४ई-१, पद्मावती, पुणे- ९
३) **सीमा रानवडे,** वेणूकुंज अपार्टमेंटस, हायवे बायपासजवळ, सिंहगड रोड, पुणे-५१

**डिसेंबर स्पर्धा निकाल**

**अनुवादकांची नावे ओळखा-** उमा कुलकर्णी, अशोक जैन, मृणालिनी गडकरी, भारती पांडे, माधव कर्वे, माधव मोर्डेकर, अपर्णा वेलणकर, चारुलता पाटील, प्रज्ञा ओक, प्रमोद जोगळेकर, अरूण मांडे, रवींद्र गुर्जर, वासंतिका पुणतांबेकर, बाळ फोंडके, वृंदा दाभोळकर, जयवंत चुनेकर, आशा कर्दळे, माधवी देसाई, अंजनी नरवणे, मंगला निगुडकर

**यशस्वी स्पर्धक**

१) **शंकर चाफाडकर,** 'साधना' २७६/बी, सेकंड क्रॉस, हलबट्टे कॉलनी, बेळगाव-३.
२) **माधुरी कुलकर्णी,** ऋग्वेद, प्लॉट नं.३२, नाना भालेराव कॉलनी, तळेगाव दाभाडे.
३) **कल्पना कामत,** एच. आय. जी.५१३, ई-७, अरोरा कॉलनी, भोपाळ-४६२०१६

**जानेवारी स्पर्धा निकाल**

**साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांची नावे :** प्र. के अत्रे, शि. म. परांजपे, राम शेवाळकर, शंकरराव खरात, वसंत बापट, रा. श्री. जोग, वि. स. खांडेकर, नारायण सुर्वे, पु. ल. देशपांडे, दुर्गा भागवत, गं. बा. सरदार, गंगाधर गाडगीळ, वि. दा. सावरकर, द. वा. पोतदार

**यशस्वी स्पर्धक**

१) **डॉ. श्री. वा. कुबल**, श्री.निकेतन, मोहानंदनगर, मांजर्ली, बदलापूर-४२१५०३
२) **आनंद ठाकूरदेसाई,** २१/बी, इंडियनएअरलाईन्स कॉलनी, सांताक्रुज ४०००२९
३) **कंठे उषाताई,** नाका नं.२च्या मागे, दर्यापुर, (बनोसा), जि. अमरावती ४४३४०४

**यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन!**

आपण आपल्या पसंतीची १००रुपयांची पुस्तके कळवावीत.
आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथ जगत,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे-३०

## झलक नव्या पुस्तकाची...




# सुवर्णमुद्रा

**शान्ता ज. शेळके**

**शान्ताबाईंच्या डोळस, रसिक नजरेने टिपलेले निवडक उतारे, वचने, सुभाषिते, काव्यपंक्ती, मार्मिक विनोद यांच्या झळाळत्या सुवर्णमुद्रा**

**किंमत : ८० रु. सवलतीत : ६४ रु.**
**सभासदांना : ६० रु. पोस्टेज : २० रु.**

### ■ इशारा ■

तुम्ही जेव्हा उत्कट आनंदाच्या ऐन भरात असाल तेव्हा कुणालाही, काहीही वचन, आश्वासन देऊ नका आणि तुम्ही जेव्हा अत्यंत संतापलेले असाल तेव्हा कुणाच्या कसल्याही पत्राचे उत्तर देऊ नका.

- चिनी म्हण

### ■ नव्या लुगड्याचा आनंद ■

स्त्रीचे वय काही असो, मनासारखे लुगडे पोटभर वापरायला मिळावे, अगदी चिंध्या होइस्तवर ते वापरावे, मग त्याची रजई करावी, किंवा आपण कोरेच वापरावे नि ते आपल्या मुलीबाळींनी कौतुकाने वापरावे अशी एक प्रबळ इच्छा प्रत्येक स्त्रीमनात खोलवर रुजलेली असते. मनासारखे लुगडे मिळाले की त्याच्याबरोबरच स्त्रीच्या मनाचे वय पालटते. क्षणिक का होईना, एक निरागस तजेला तिच्या मुखावर येतो. वय काही असो, रूप असो नसो, मनपसंत वेषभूषा केलेली स्त्री नारीजातीच्या स्थलकालातीत लावण्याच्या तजेल्यात डुंबून आल्याचे सुख भोगते.

- दुर्गाबाई भागवत

### ■ अंतिम इच्छा ■

डॉक्टर पेशंटला गंभीरपणे म्हणाले, 'सांगायला वाईट वाटते. तुम्ही आता फार तर एखाद्याच दिवसाचे सोबती आहात. मरणापूर्वी काही हवं असल्यास सांगा. तुमची काही इच्छा आहे ?'


'आता डॉक्टर बदलून पाहावा असं मला फार वाटतं.' क्षीण स्वरात पेशंटने सांगितले.

### ■ मैत्री ■

नि:स्वार्थी आणि निरपेक्ष मैत्री ही या जगामधली एक अत्यंत दुर्मिळ आणि सुंदर अशी गोष्ट आहे. तिचा लाभ ज्यांना झाला आहे ते भाग्यवान म्हणायला हवेत.



## झलक नव्या पुस्तकाची...




# चाळिशीनंतरची वाटचाल

**डॉ. सुभाष दांडेकर**

**चाळिशी आली? चिंता करू नका!**

**चाळिशीनंतरच्या संपन्न वाटचालीसाठी महत्त्वाच्या सर्व विषयांवरील उत्कृष्ट मार्गदर्शन.**

**किंमत : १००रु. सवलतीत : ८०रु.**
**सभासदांना : ७५ रु. पोस्टेज : २०रु.**

### तयारी मनाची

तुम्ही बाल्यावस्थेत तारुण्याची तयारी केलीत, तारुण्यात इतके रमलात की वार्धक्य आणि मृत्यूची तयारी करायचेच विसरलात. आणि जेव्हा या अटळ गोष्टी समोर येऊन उभ्या ठाकल्या तेव्हा भांबावून गेलात!

उत्पत्ती, स्थिती आणि लय या तीनही अवस्था स्वतंत्र असूनही त्यांचा संधीकाल एकमेकात इतका बेमालूम मिसळलेला असतो की तो बदल जाणवतच नाही.

आपण सतत नजिकच्या भविष्याचा विचार करतो. चाळिशीत आपण आयुष्यात बरेच स्थिर झालेलो असतो पण यावेळी साठीचा विचार, मृत्यूचा विचार मात्र करत नाही. उलट चाळिशीतच आपण कायम राहणार आहोत अशा थाटाने वागत राहतो. जन्माला आल्यावर प्रत्येकाच्या आयुष्यात एक गोष्ट मात्र निश्चित घडणार आहे आणि ती म्हणजे मृत्यु! आपण प्रत्येक गोष्टीची तयारी करतो पण मृत्यु या कल्पनेपासूनही लांब राहतो. आश्चर्य आहे जे अटळ आहे त्याचा विचार आपण टाळतो आणि जे अनिश्चित आहे त्याच्या विचारात आयुष्य बरबाद करतो! आयुष्याच्या त्या त्या स्थितीचा विचार करून त्याची तजवीज जरूर केली पाहिजे पण हे सगळे संपण्यापूर्वी जीवनाचा आणि अंताचा विचार करणे खरे तर अपरिहार्य नाही का?

भगवंताची आस, या विश्वाचे कोडे उलगडण्याचा प्रयत्न चाळिशीतच सुरू झाला पाहिजे. कोडे उलगडणे राहू दे पण भगवंत, भले त्याला अल्ला, येशू, निसर्ग काहीही म्हणा पण त्याच्या लीला तरी पहा. जोपर्यंत हात पाय हालत आहेत, बुद्धी शाबूत आहे, तोपर्यंत इतरेजनांसाठी काहीतरी करा. आयुष्यात स्व साठी सर्व काही केले. निरपेक्षपणे काही दुसऱ्यांसाठी करा. त्याची चव वेगळीच आहे.

परमकृपाळू परमेश्वराने वृद्धत्व दिले ते शाप म्हणून नव्हे. दृष्टी क्षीण होते ती तुम्ही अंत:चक्षूंनी जगाला पहावे, परमेश्वराला पहावे यासाठी. कानांनी कमी ऐकू येते, ते संसारिक गोष्टींकडे लक्ष देऊ नये यासाठी! जिभेची चव जाते ती तिचे चोचले बंद करावे यासाठी! स्पर्शज्ञान कमी होते ते शरीरसुख दुर्लक्षिले जावे यासाठीच! मन मात्र जागृत राहते ते भगवंत चिंतन करण्यासाठीच!

# वाचकांचा प्रतिसाद

आपले दर महिन्याचे संपादकीय अतिशय वाचनीय असते.

आपण निवेदन केलेले प्रकाशन व्यवसायाचे आशादायक भविष्य उत्साहवर्धक आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'टी बुक क्लब' च्या कल्पक योजनेमुळे इतर भाषेतील उत्तम पुस्तके वाचनप्रेमी रसिकांपर्यंत लवकर पोचतात आणि मराठी वाचकांना त्याचा आनंद मिळतो. आपल्या विस्तृत साहित्यवार्ता सदरामुळे मराठी साहित्यजगतातील घडामोडी आणि पुरस्कारांविषयीची माहिती एकत्रितपणे वाचायला मिळते. थोडक्यात करून दिलेला पुस्तकपरिचय पुस्तक लगेच मिळवून वाचण्याची उत्सुकता वाढवतो. 'फुले आणि काटे'मुळे समतोल साधला जातो.

'मेहता मराठी ग्रंथजगत'ला हार्दिक शुभेच्छा व ग्रंथजगतच्या सर्व परिवाराचे स्नेहमय शुभचिंतन. कळावे. लोभ असावा.

सौ. मुक्ता केणेकर, मुंबई.

लोकांच्या गर्दीतून माणसांपर्यंत पोहचण्याचा आपला कल्पक असा हा उपक्रम खरोखरच प्रशंसनीय आहे.

डिसेंबर २००१ चा अंक मनापासून आवडला. विशेषत: त्यातील संपादकीय मथळ्याखालील अ.भा. मराठी साहित्य संमेलनावरील विचार मौलिक व गंभीर आहेत. त्याकडे डोळेझाक करून चालणार नाही. त्याप्रमाणेच पृष्ठ ४५ वर 'फुले आणि काटे' या शीर्षकाखाली दासू वैद्य यांनी नवोदित कवींना जे मार्गदर्शन केले ते नव्या कवींना कल्पनेपेक्षा वास्तवाची जाण करून देण्यास पूर्णपणे समर्थ आहे. त्यामुळे मी दासू वैद्य यांचे विशेष आभार मानतो. पुनश्च आपल्या उपक्रमाला हार्दिक शुभेच्छा!

अमोल पुरंदरे, लक्ष्मी नगर,<br>डाबकी रोड, अकोला ४४४ ००२.

मराठी वाङ्मयव्यवहाराची इतकी चांगली दखल, नोंद घेणारा डिसेंबर२००१चा ग्रंथजगतचा अंक मराठीप्रेमींनी वाचायलाच हवा. या अंकातला पुरस्कारप्राप्त पुस्तकांची झलक देणारा उपक्रम विशेष आवडला. त्यावरून पुस्तकाचा आशय, विषयाचं स्वरूप कळतं. वाचनाभिमुख करणारा असा हा उपक्रम आहे. ग्रंथप्रसाराला वाहिलेल्या आपल्या उपक्रमाला हार्दिक शुभेच्छा!

नंदा सुर्वे

या अंकामुळे साहित्यक्षेत्रातील बरीच माहिती मिळाली. नवी पुस्तकं, नव्या घडामोडी वाचकांपर्यंत पोचविण्यासाठी ग्रंथ जगतचं हे मौलिक माध्यम या गरजेची पूर्ती करणारन आहे. साहित्याशी नातं असणाऱ्या प्रत्येकाशी ग्रंथजगत जिव्हाळ्याचं नातं जोडेल यात शंका नाही.

सुरेश पाचकवडे<br>'शिवदया' राऊतवाडी<br>अकोला ४४४००५



# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ मार्च २००२
◆ वर्ष दुसरे
◆ अंक चौथा

*— अनुक्रमणिका —*


| | |
|---|---|
| **संपादकीय** - | २ |
| **साहित्यवार्ता** | ५ |
| **पुरस्कार** | १७ |
| **पुस्तक परिचय** | |
| एकवचनी | १८ |
| द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज : | |
| अनुवाद : अपर्णा वेलणकर | २३ |
| शुक्रचांदणी | २७ |
| डिफिकल्ट डॉटर्स : अनु. : रेणू गावस्कर | ३१ |
| अ मेथॉडिकल इंग्लिश ग्रामर | ३६ |
| **फुले आणि काटे** | ४० |
| **नवी स्पर्धा** | ३५ |
| **स्पर्धा निकाल** | ४५ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ४८ |


✠ संपादक :
सुनील मेहता

✠ कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

✠ संपादन सहाय्य :
सुनीता दांडेकर

✠ अंकाची किंमत १० रु.

✠ वार्षिक वर्गणी ८० रु.
तीन वर्षांची २००रु.
पाच वर्षांची ३००रु.

✠ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

✠ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

✠ मांडणी-अक्षरजुळणी :
***मेहता पब्लिशिंग हाऊस***

✠ संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१२१६ सदाशिव पेठ, धनश्री अपार्टमेंट्स, पुणे-३०.
फॅक्स : ०२०-४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*